**(कोलकाता येथे जानेवारी १७-२०, २०१२ च्या केंद्रीय समितीच्या बैठकीत स्वीकारण्यात आलेला)**

# काही वैचारिक प्रश्नांविषयी ठरावाचा मसुदा

## १
## प्रस्तावना

१.१ भांडवलशाही एका अरिष्टात सापडली आहे. या अरिष्टाचे स्वरूप कित्येक बाबतीत १९३०च्या दशकातील महामंदीहून खूपच तीव्र आहे आणि या अरिष्टाने पुन्हा एकदा भांडवलशाहीचे अंगभूत अत्याचारी आणि शोषक रूप दाखवून दिले आहे. जगातील बहुसंख्य जनतेला हे अरिष्ट मोठ्या प्रमाणावर दैन्यावस्थेत ढकलत आहे. आपले अस्तित्वच नाकारण्याची आणि झाकण्याची कितीही वैचारिक झटापट साम्राज्यवाद करत असला तरी मानवाच्या विरोधात जागतिक भांडवलशाहीने उघडलेल्या आक्रमक मोहिमेचे नेतृत्व साम्राज्यशाहीच करत असल्याचे या अरिष्टाने वारंवार दाखवून दिले आहे. मानवाची गुलामीतून मुक्तता होऊन त्याला संपूर्णत: स्वतंत्र आणि प्रगत आयुष्य जगण्यात जागतिक प्रभुत्वासाठी आटापिटा करणारी साम्राज्यशाही हाच मुख्य अडथळा आहे.

१.२ वीस वर्षांपूर्वी जानेवारी १९९२ मध्ये झालेल्या माकपच्या पक्ष परिषदेत सोव्हिएत युनियनच्या विघटनानंतर जगातील वर्गशक्तींचे संतुलन साम्राज्यशाहीच्या बाजूने झुकल्याचा निष्कर्ष काढण्यात आला होता. सोव्हिएत युनियनच्या विघटनामुळे जगभरात प्रचंड राजकीय, आर्थिक आणि सामाजिक बदल घडून आले आहेत. हे बदल होत असताना मार्क्सवाद आणि समाजवाद आता मरून पडले आहेत असे वैचारिक ढोल बडवले जाऊ लागले होते. भांडवलशाही ही "अमर" आहे आणि तीच मानवाच्या सामाजिक उत्क्रांतीची अत्युच्च अवस्था आहे असा पुकारा होऊ लागला होता.

१.३ आपण त्यावेळी जी भीती व्यक्त केली होती तसेच या वीस वर्षांच्या काळात घडून आले आहे. साम्राज्यशाहीचे आक्रमण सर्वच क्षेत्रात खरोखरच अत्यंत तीव्र झाले आहे. या आक्रमणाच्या जोडीला आहे साम्राज्यवादी जागतिकीकरण. या जागतिकीकरणाच्या प्रभुत्वाखाली जगातले जवळ जवळ सर्वच देश ओढले गेले आहेत.

१.४ तेव्हा मानवमुक्तीच्या प्रयत्नांचे एक अविभाज्य अंग म्हणून जागतिक घडामोडींचे मार्क्सवादी-लेनीनवादी विश्लेषण करणे, ही आपली जबाबदारी आहे. या घडामोडींचा जागतिक परिस्थितीवर, म्हणजेच जगातील वर्गशक्तीच्या संतुलनावर, काय परिणाम झाला, आणि आपल्या देशातील क्रांतीकारक उद्दिष्टाच्या रणनीती आणि डावपेचांवर काय परिणाम झाला याचे विश्लेषण करणे अगत्याचे आहे.

१.५ भारतीय कम्युनिस्ट पक्ष एकत्र असताना त्याला दुरूस्तीवादाने घेरले होते. दुरूस्तीवादी विकृतीमुळे भारतीय कम्युनिस्ट चळवळ आणि पर्यायाने जनमुक्तीचा लढा गंभीर धोक्यात आल्याने त्या विकृतीविरुद्ध करण्यात आलेल्या तीव्र संघर्षातून भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) स्थापन झाला. भारतीय क्रांतीची रणनीती आणि डावपेच काय असावेत आणि भारताच्या सत्ताधारी वर्गांची रचना आणि चारित्र्य काय आहे या भूमिकांवर अत्यंत तीव्र असा पक्षांतर्गत वैचारिक संघर्ष झाला, आणि त्यामधून मार्क्सवाद-लेनीनवादाची क्रांतीकारी तत्त्वांचे पालन करण्यासाठी आणि भारताच्या वास्तव परिस्थितीत त्यांचा अवलंब करण्यासाठी कटिबद्ध असलेला माकप निर्माण झाला.

१.६ मागोमाग अल्प काळातच माकपला डाव्या साहसवादी दुष्प्रवृत्तीशी सामना करून पुन्हा भारतीय क्रांतीची गाडी रूळावर आणण्यासाठी वैचारिक संघर्ष करावा लागला. आपण हा वैचारिक संघर्ष करत असतानाच आपल्यावर अत्यंत निष्ठूर असे शारीरिक हल्ले करण्यात आले, त्यात कित्येक कॉम्रेड शहीद झाले. या स्तरावरदेखील आपल्याला चळवळीतील दुष्प्रवृत्तीशी दोन हात करावे लागले.

१.७    या दुष्प्रवृत्तींशी केलेल्या संघर्षात आपल्याला यश आले. त्याचसोबत भारतीय जनतेने केलेल्या अत्यंत लढाऊ चळवळींचा वारसा स्वीकारल्याने **(१)** माकप देशातील बलशाली कम्युनिस्ट आणि डावी शक्ती म्हणून उदयाला आली. यावरून  या वैचारिक सघर्षांमध्ये आपण योग्य अशी मार्क्सवाद-लेनीनवादी भूमिका घेतली होती, हेच सिद्ध होते.

१.८    माकपने या वैचारिक विकृतींशी केलेला संघर्ष आणि मार्क्सवाद-लेनीनवादाच्या क्रांतीकारी आशयाची निर्धाराने केलेली पाठराखण या दोन्हींना एक बळकट आधार होता. आपण देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही स्तरांवर सर्व प्रकारच्या विकृतींशी सातत्याने वैचारिक संघर्ष करत होतो. या वैचारिक विकृतींची लागण जगात बलशाली असलेल्या सोव्हिएत आणि चिनी कम्युनिस्ट पक्षांनादेखील झाली होती. या वैचारिक संघर्षांमुळेच आपला पक्ष मजबूत होऊन देशातील मुख्य कम्युनिस्ट आणि डावी शक्ती बनलाच, शिवाय भारताच्या राष्ट्रीय राजकारणावर प्रभाव आणि दबाव टाकू शकणारा पक्षदेखील बनला.

१.९    आपल्या पक्षाची व्यूहात्मक उद्दिष्टे गाठण्यासाठी असे वैचारिक संघर्ष १९६८च्या बरद्वान (बर्धमान) प्लीनमपासून खूपच गरजेचे बनत गेले. पूर्वाश्रमीच्या सोव्हिएत युनियन आणि पूर्व युरोपातील समाजवादाचे पतन झाल्यानंतर पक्षाच्या १४व्या परिषदेत "काही विशिष्ट वैचारिक प्रश्नांविषयी" हा ठराव स्वीकारण्यात आला. त्यानंतर जगात झालेल्या बदलांच्या प्रकाशात २००० साली आपण पक्ष कार्यक्रम अद्ययावत केला. यानंतर सोव्हिएत युनियनचे विघटन आणि साम्राज्यवादी जागतिकीकरणाचा उदय या घडामोडींच्या संदर्भात  बदलत असलेल्या जागतिक परिस्थितीचे विश्लेषण आपण पक्ष परिषदांमधून आणखी समृद्ध करत आलो आहोत.

१.१०  साम्राज्यवादी जागतिकीकरण मानवजातीवर अभूतपूर्व दैन्य लादत असताना या हल्ल्याविरुद्धचे लोकसंघर्षही वाढत आहेत. हे जागतिक परिस्थितीत विशेषत: लॅटिन अमेरिकेत जास्त तीव्रपणे व्यक्त होत आहे. साम्राज्यवादी नव-उदार जागतिकीकरण लोकांच्या जगण्यावरच घाला घालत आहे. त्यात आलेल्या भांडवली अरिष्ट आणि मंदीमुळे लोकांची दैन्यावस्था जास्तच तीव्र होत आहे. त्यामुळे "वॉल स्ट्रीट ताब्यात घ्या" सारखी आंदोलने जगाच्या सर्व भागात, आणि विशेषत: युरोपात, वाढीला लागली आहेत. कामगार वर्ग आणि जनतेच्या इतर शोषित विभागांचे जीवनमान आणखी खालावू नये म्हणून चाललेल्या या लढ्यांच्या पायावर भविष्यातील क्रांतीकारी लढे उभारले जाऊ शकतात.

१.११  सध्याच्या आंतरराष्ट्रीय वर्गशक्तींचे संतुलन पहाता या वाढत्या आंदोलनांचे रूपांतर भांडवलाच्या सत्तेवरील हल्ल्यात करायचे तर अनेक आव्हानांवर मात करावी लागेल. कामगार वर्गाच्या नेतृत्वाखाली वर्गसंघर्ष तीव्र होतात की नाही यावरच भांडवलाच्या सत्तेवर यशस्वी आणि निर्णायक चढाई होईल की नाही, हे ठरेल. आणि ही चढाई शक्य होईल क्रांतीकारी लढ्यातील "आत्मनिष्ठ घटक" संघटित होऊन बलवत्तर झाला तरच. हा "आत्मनिष्ठ घटक" असतो कामगार वर्गाच्या नेतृत्वाखालील सर्व शोषितांच्या आणि जनतेच्या मुक्तीलढ्यातील वर्गीय एकजूट.

१.१२  अशा परिस्थितीत, विशेषत: घटना सतत वेगाने घडत असताना, मानवमुक्तीचे एकमेव उद्दिष्ट गाठण्यासाठी वैचारिक प्रश्नांचे आणि नव्या घटनांनी निर्माण केलेल्या आव्हानांचे मार्क्सवादी-लेनीनवादी विश्लेषण करून आपण आपला क्रांतीकारी निर्धार पक्का करायला हवा.

## २
## जागतिकीकरणाच्या युगातील साम्राज्यवादाची वाटचाल

२.१    मार्क्सवाद-लेनीनवादाची कास घट्ट पकडत आणि 'ठोस परिस्थितीचे ठोस विश्लेषण' या त्याच्या साधनाचा वापर करत माकप साम्राज्यवादाच्या सद्यावस्थेचे आणि त्याच्या भारतावरील प्रभावाचे मूल्यमापन करतो. आपले व्यूहात्मक उद्दिष्ट गाठायचे तर देशावर साम्राज्यवादाचा प्रभाव कसा आहे

याच्या समजावरच योग्य पावले उचलता येतात.

२.२ जागतिकीकरणाचे आकलन त्याच्या सर्वंकष रूपात करता आले पाहिजे. मार्क्सने दाखवून दिल्याप्रमाणे भांडवलशाहीच्या अंगभूत गतीमुळे भांडवल हे केवळ काही लोकांच्या हातातच केंद्रित होत असते. या प्रवृत्तीचे विश्लेषण करूनच लेनीनने साम्राज्यवादाचा उगम आणि विकास मक्तेदार भांडवलशाहीच्या अवस्थेतून कसा होतो हे दाखवून दिले. भांडवलशाहीची अंतिम अवस्था असलेल्या साम्राज्यवादी राजकारणाच्या लेनीनने केलेल्या विश्लेषणाच्या आधारावरच योग्य अशा क्रांतीकारी व्यूहरचनेचा पाया घातला गेला. या व्यूहरचनेतून वर्ग संघर्ष तीव्र झाले आणि त्याची निष्पत्ती झाली मानवी इतिहासात प्रथमच कामगारवर्गीय क्रांतीला विजय मिळवून देणाऱ्या १९१७च्या ऑक्टोबर समाजवादी क्रांतीत.

२.३ जागतिकीकरण हा साम्राज्यवादातीलच एक टप्पा आहे. या टप्प्यावर भांडवलाचे अतिप्रचंड केंद्रिकरण झाले आहे. गेल्या वीस वर्षांतील भांडवलाच्या या केंद्रिकरणाच्या आघाडीवर आंतरराष्ट्रीय वित्त भांडवल आहे. **(२)** जास्तीत जास्त नफ्याच्या शोधात हे भांडवल जगभर देशांच्या सीमा लीलया पार करत संचार करत असल्याने जगाच्या रचनेत बदल घडून आला आहे. भांडवलाचा मुक्त संचार ही वित्तीय उदारीकरणाची पूर्वअट असते. यासाठी भांडवलाच्या अशा मुक्त संचाराला अडथळा करणारी सर्व बंधने झुगारून टाकली जातात. यासाठी आर्थिक सुधारणांच्या नावाखाली नव-उदार हल्ले सुरू केले जातात. या हल्ल्यांचे लक्ष्य राष्ट्र-राज्यांचे, विशेषत: विकसनशील राष्ट्र-राज्यांचे, सार्वभौमत्व हे असते.

२.४ आपण यापूर्वी म्हटल्याप्रमाणे इतिहासात नवा टप्पा उदयाला येतो याचा अर्थ त्या टप्प्याच्या अंतर्गत काहीच बदल होत नसतात असा होत नाही. समाजाच्या प्रत्येक अवस्थेत नव्या टप्प्यावर संख्यात्मक बदलातून गुणात्मक बदल होत होऊन समाज नवा टप्पा गाठतो, या न्यायाने साम्यवादाकडे संक्रमण करत असताना समाजवादी अवस्थेत काही बदल होत असतात; समाजवादातील कामगारवर्गीय शासनसंस्थेच्या कार्यपद्धतीत बदल होत रहातात; तसेच बदल साम्राज्यशाही अवस्थेतही होत असतात. त्यामुळे इतिहासातील कोणतीही अवस्था एकरेषीय नसते; तो 'एकदिशा' मार्ग नसतो. साम्राज्यशाहीच्या अवस्थेत वित्तीय भांडवलाच्या प्रभुत्वाचे लेनीनने केलेले विश्लेषण किती अचूक होते हे साम्राज्यशाहीच्या सध्याच्या अवस्थेने दाखवून दिले आहे.

२.५ जगातील वर्गीय शक्तींचे संतुलन साम्राज्यशाहीच्या बाजूने झुकलेले असताना जागतिकीकरणामुळे भांडवलाला जास्तीत जास्त नफा कमावण्याची वाट विनासायास मोकळी होते. अर्थात याला ज्या ज्या ठिकाणी प्रभावी लोकलढ्यांनी विरोध केला त्या देशांचा अपवाद करावा लागेल. पण सर्वसाधारणत: जगभर कमावलेल्या अतिप्रचंड नफ्याच्या जोरावर आंतरराष्ट्रीय भांडवलाची मात्रा आणि बळ वाढले आहे. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळातील जागतिक भांडवलशाहीचे हे एक महत्वाचे वैशिष्ट्य आहे. वित्त भांडवलाचा हा महा-संचय होण्याला सोव्हिएत युनियन आणि पूर्व युरोपात झालेल्या प्रतिक्रांतीचाही मोठा हातभार लागलेला आहे. पूर्वाश्रमीचा सोव्हिएत युनियन आणि पूर्व युरोपातील देशांचा जागतिक भांडवली बाजारपेठेत पुनर्प्रवेश झाला आहे. माहिती तंत्रज्ञानात झालेल्या विकासाचा फायदा घेऊन जागतिक भांडवलशाहीने आपल्या संरचनेत बदल घडवून आणले. त्यामुळे जेथे विपुल नैसर्गिक संपत्ती आणि स्वस्त श्रमशक्ती आहे अशा प्रदेशांत भांडवलशाहीने आपले उत्पादन हलवले, outsource केले. यामधून जो महाप्रचंड नफा कमावला त्यातून भांडवलाच्या राशी मोठ्या प्रमाणात वाढवून घेतल्या.

२.६ लेनीनच्या काळात भांडवलाचे हित राष्ट्र-राज्याच्या रूपात राखले जाई, त्याचे संवर्धन केले जाई. आता ती परिस्थिती बदलली आहे. आता वित्त भांडवलाचे हित राष्ट्र-राज्याबाहेर जाऊन आंतरराष्ट्रीय पातळीवर राखले जाते. विकसित राष्ट्र-राज्ये आपले विशिष्ट हित राखायचा प्रयत्न सोडणार नाहीत, हे खरेच; पण साम्राज्यशाहीच्या अंतर्गत तीव्र स्पर्धा राहिलेली नाही अशा वातावरणात आंतरराष्ट्रीय वित्त भांडवल वावरत असते. निदान तात्पुरते का होईना पण भांडवली राष्ट्रांनी परस्पर शत्रुत्व मिटवलेले

आहे, अशा जगात ते वावरत असते. जगभर अप्रतिहत संचार करत रहाणे हेच या आंतरराष्ट्रीय वित्त भांडवलाचे वैशिष्ट्य असते. यावरून आता जग लेनीनच्या काळातील वित्त भांडवल आणि साम्राज्यशाही यांच्या पलिकडे गेले आहे, आणि त्यामुळे त्याने केलेले साम्राज्यशाहीचे विश्लेषण आता कालबाह्य झाले आहे, असा अत्यंत चुकीचा निष्कर्ष काही लोक काढतात.

२.७ वित्त भांडवलाचा उदय, बँक भांडवल आणि औद्योगिक भांडवलाची हातमिळवणी यांच्या वास्तवाचे विश्लेषण करून लेनीनने त्या काळात या घडामोडींच्या प्रभावामुळे वित्त भांडवलाचे पारंपरिक रूप पालटून त्याने आता साम्राज्यशाही हा नवा टप्पा गाठला असल्याचे सिद्ध केले. या टप्प्याची पाच वैशिष्ट्ये होती. **(३)** जास्तीत जास्त नफा कमावण्यासाठी साम्राज्यशाहीच्या विविध केंद्रांनी परस्परांशी केलेल्या स्पर्धेतून जगाची विभागणी होते; आणि अशी विभागणी करायच्या नादात त्याची साम्राज्यवादी युद्धात परिणती होते, असे प्रतिपादन लेनीनने केले होते. विसाव्या शतकातील पहिल्या पन्नास वर्षांतच झालेल्या दोन महायुद्धांनी लेनीनचे प्रतिपादन किती अचूक होते, हे सिद्ध करून दाखवले. 'ठोस परिस्थितीचे ठोस विश्लेषण' या आपल्या पायाभूत तत्त्वाचा वापर करून लेनीनने आपल्या काळातील आंतरराष्ट्रीय वर्गशक्तींच्या संतुलनाचे अचूक मापन केले होते. त्यामुळेच "साम्राज्यशाहीच्या साखळीतील कच्चा दुवा तोडून" रशियन क्रांती यशस्वी करणे शक्य झाले.

२.८ पण लेनीनने आपल्या मर्मग्राही दृष्टीने आजच्या जगावरही प्रकाश टाकला आहे. "मक्तेदार भांडवलातून वित्तीय भांडवलाचे प्रभुत्व निर्माण होते", असे लेनीनने प्रतिपादले होते. साम्राज्यशाहीची व्याख्या करत असताना लेनीनने वित्त भांडवलाचे प्रभुत्व निर्माण होणे ही भांडवलशाहीची अत्युच्च अवस्था असते, आणि या अवस्थेत वित्त भांडवल इतर सर्व प्रकारच्या भांडवलांवर आपली सत्ता प्रस्थापित करते असे दाखवून दिले होते. या संदर्भात लेनीनने 'भांडवलाच्या निर्यातीचा' उल्लेख केला होता. याच घडामोडीचा पुढे विस्तार कसा होईल हे सांगताना लेनीन म्हणाला होता, "अशा रीतीने वित्त भांडवल जगातील सर्व देशांना आपल्या जाळ्यात ओढून घेते." याही पुढे जाऊन तो म्हणाला होता, "साम्राज्यशाहीचे वैशिष्ट्य ओद्योगिक भांडवल नव्हे तर वित्त भांडवल हे असते". **(४)**

२.९ साम्राज्यशाहीच्या अवस्थेत वित्त भांडवल नुसते प्रभुत्वस्थानी आणि नेतृत्वाच्या स्थानी येणार नाही, तर ते सर्व प्रकारचे भांडवल नफा वाढवण्याच्या उद्देशाने आपल्या पोटात घेईल अशी भविष्यवेधी मांडणी लेनीनने केली होती. यावरून साम्राज्यशाहीचे लेनीनने केलेले विश्लेषण मुळीच कालबाह्य झालेले नाही, हेच सिद्ध होते. कालबाह्य झाले असेल ती लेनीनच्या काळातील 'ठोस परिस्थिती'. असे म्हणत असताना लेनीनने त्या 'ठोस परिस्थितीचे' विश्लेषण आणि मूल्यमापन करताना, तिच्या पोटातून भविष्यात आकार घेणाऱ्या अवस्थेचा वेध घेताना किती द्रष्टेपणा दाखवला होता हे विसरता कामा नये. लेनीनची ही भविष्यवेधी मांडणी किती अचूक होती, हे साम्राज्यशाहीत वित्त भांडवलाने मिळवलेल्या प्रभुत्वाने दाखवून दिले आहे. त्यामुळे प्रत्येक देशातील क्रांतीकारी उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी आजच्या मार्क्सवाद – लेनीनवाद्यांनी साम्राज्यशाहीच्या प्राप्त अवस्थेत वित्त भांडवलाचे स्थान व भूमिका काय याचे विश्लेषण आणि मूल्यमापन केले पाहिजे.

२.१० आज आंतरराष्ट्रीय वित्त भांडवलाने प्रभुत्व प्रस्थापित केले आहे, याचा अर्थ साम्राज्यशाहीच्या अंतर्गत असलेले परस्पर वितुष्ट संपुष्टात आले आहे, असा अजिबात नाही. तसे वितुष्ट आहेच, आणि भांडवलशाहीच्या असमान विकासाच्या नियमानुसार ते जास्त तीव्र होणे क्रमप्राप्त आहे. जगातील संसाधनांवर ताबा मिळवण्यासाठी आणि जगाची पुनर्रचना करण्यासाठी जगभरच्या भांडवली केंद्रांमध्ये स्पर्धा आहे. त्यांची परस्पर तुलनात्मक ताकद जसजशी विकसत जाईल तसतशी त्यांच्यातील जगाची नव्याने पुनर्रचना करण्यासाठी विविध विभाग ताब्यात ठेवण्याची स्पर्धा तीव्र होत जाईल. साम्राज्यवादी शक्तींमध्ये चलनावरूनही भांडण भडकू शकते. समाजवादी आणि विकसनशील देशांनी आपल्या देशातील चलनविषयक धोरण साम्राज्यशाहीच्या फायद्यासाठी बदलावे, म्हणूनही त्यांच्यावर दबाव टाकला जाईल.

२.११ भांडवलशाहीत अतिरिक्त मूल्य केवळ उत्पादन प्रक्रियेतच निर्माण होत असते. या अतिरिक्त मूल्यावर कसा कब्जा केला जातो आणि त्याचा वापर कसा होतो, यावरून ज्यादा रोकड निर्माण होऊ शकते. उत्पादन प्रक्रियेतून निर्माण झालेले अतिरिक्त मूल्य आंतरराष्ट्रीय वित्त भांडवलाच्या गरजेनुसार अशा रीतीने विविध तऱ्हांनी गुंतवले जाते. कार्पोरेट भांडवलाची बाजारात किंमत वाढवण्यासाठी सट्टाबाजाराचा वापर करून नवी वित्तीय साधने निर्माण केली जातात आणि त्यांचा उपयोग रोकड वापराच्या नव्या वाटा निर्माण करण्यासाठी केला जातो. अशा मार्गांनी रोकड व्यवहार वाढत जातो आणि 'बुडबुडे' निर्माण होऊ लागतात. या 'बुडबुड्यांमुळे' अर्थव्यवस्था तात्पुरती फुगते, पण शेवटी हे बुडबुडे फुटतात आणि अर्थव्यवस्था अरिष्टात सापडते.

२.१२ अशा रीतीने नफा वाढवण्याच्या उद्योगात असलेल्या आंतरराष्ट्रीय वित्त भांडवलाच्या पोटात औद्योगिक आणि इतर भांडवल अडकलेले आहे. याहून अधिक नफा कमावण्यासाठी आणि भांडवलाच्या राशीच्या राशी जमवण्यासाठी एकत्र आलेल्या भांडवलाची आघाडी आंतरराष्ट्रीय वित्त भांडवल आक्रमकपणे सांभाळत आहे.

२.१३ जास्तीत जास्त नफा कमावण्यासाठी आंतरराष्ट्रीय वित्त भांडवलाच्या हुकमाने जगाची पुनर्रचना करायचे काम नव-उदारवादावर सोपवण्यात आले आहे. नव-उदारवाद सर्वप्रथम वस्तू आणि भांडवल यांचा सीमापार संचार करण्यावर असलेली बंधने उठवून टाकतो. मुक्त व्यापार स्थानिक उद्योजकाला जीवनातून उठवून लावतो. त्यामुळे स्थानिक औद्योगिक व्यवस्थेचे रूपांतर निरुद्योगी (deindustrialized) समाजात होते. हा धोका विकसनशील देशांना जास्त संभवतो. विकसित देशांमध्ये देखील तेथील उद्योग आणि व्यापार देशाबाहेर हलवल्याने तो समाज निरुद्योगी होऊ लागतो. भांडवलाला मुक्त संचार करायचा परवाना मिळाल्याने बहुराष्ट्रीय कार्पोरेट कंपन्या (आपल्या देशातील सार्वजनिक उद्योगांसारखी) स्थानिक उत्पादक संपदांवर ताबा मिळवून आपल्या भांडवलाच्या राशीत महाकाय भर घालू लागतात.

२.१४ भांडवलाच्या राशी वाढवण्याचे इतर उपायही योजले जातात. राजकोषीय शिस्तीच्या नावाखाली, सरकारला आपली गुंतवणूक कमी करायला भाग पाडले जाते. (त्यामुळे आंतरराष्ट्रीय वित्त भांडवलाला आपला सट्ट्यातून मिळणारा नफा वाढवायला रोखता उपलब्ध करून घेता येते.) या कारणाने जगातील अर्थव्यवस्थेतील एकूण मागणी कमी होऊ लागते; विकसनशील देशांतील व्यापारशर्ती शेतकऱ्यांच्या विरोधात जाऊ लागतात; जगभरात सामाजिक सेवा देण्याच्या क्षेत्रातून सार्वजनिक क्षेत्राला बाहेर काढले जाते (याचा जास्त फटका विकसनशील देशांना बसतो); सार्वजनिक क्षेत्र वरचेवर खासगी क्षेत्राच्या दावणीला बांधून नवनव्या प्रचंड सार्वजनिक गरजेच्या सुविधा नफा वाढवण्याच्या उद्योगाला बहाल केल्या जातात. अशा रीतीने आजपर्यंत जी क्षेत्रे खासगी नफेखोरीला उपलब्ध नव्हती, किंवा अस्तित्वातच नव्हती, ती जबरदस्तीने खुली करून देणे हे साम्राज्यशाहीच्या प्रस्तुत अवस्थेचे खास वैशिष्ट्य आहे.

२.१५ विकसनशील देशांतील स्थानिक भांडवलदारांचा मोठा विभाग आपला साथीदार बनावा यासाठी साम्राज्यशाही त्यांच्यावर दबाव टाकू लागते. यापैकी अनेक देशांतील निर्वसाहतीकरणाचा लढा तेथील स्थानिक भांडवलदार वर्गाच्या नेतृत्वाखाली लढवण्यात आला होता. त्या देशांच्या स्वातंत्र्यानंतर त्या स्थानिक भांडवलदार वर्गांनी तुलनेने स्वायत्त असा भांडवली विकास करून घ्यायचा प्रयत्न केला. भारतात झाले त्याप्रमाणे या वर्गाने स्थानिक जमीनदारीशी दोस्ती करत आणि परकीय वित्त भांडवलाशी तडजोड करत काही प्रमाणात स्वायत्तता राखत भांडवली विकास करायचा प्रयत्न केला. त्यासाठी परराष्ट्र धोरणात गटनिरपेक्ष भूमिका स्वीकारली. या भूमिकेचा सोव्हिएत युनियनची मदत घेत साम्राज्यशाहीशी सौदा करण्यासाठी उपयोग करून घेतला. पण या व्यवस्थांमध्ये अंगभूत अंतर्विरोध होते. त्यात सोव्हिएत युनियनचे पतन झाले आणि नफ्याच्या राशी वाढवण्याच्या शोधात जगभर आक्रमकपणे वावरणाऱ्या वित्त भांडवलाने या नव्या अर्थव्यवस्थांची कवाडे जबरदस्तीने खोलायचा तगादा लावला. याच्या परिणामी विकसनशील देशांतील स्थानिक भांडवलदार वर्गाची दृष्टी फिरली.

विकसनशील देशांतला आजपर्यंत तुलनेने स्वायत्त असलेला स्थानिक सत्ताधारी वर्ग, काही हितसंबंधात वितुष्ट असले तरी, आंतरराष्ट्रीय वित्त भांडवलाच्या कच्छपी मोठ्या प्रमाणात लागून नव-उदार भांडवली विकासनीती अंगिकारू लागले आहेत.

२.१६ भांडवलशाहीच्या संपूर्ण इतिहासात संचय दोन प्रकारे होत असल्याचे दिसून येते: १. उत्पादन प्रक्रियेतील भांडवलवृद्धीच्या साधारण गतीमधून ( आणि यातून निर्माण झालेले अतिरिक्त मूल्य मालकीमुळे भांडवलदाराच्या अधीन झालेले असते) २. आणि मार्क्स ज्याला भांडवलाचा प्राथमिक संचय म्हणतो त्या जबरदस्तीने केलेल्या हिसकावणी आणि पाशवी लुटीतून. प्राथमिक (primitive) संचय ही आधुनिकच्या विरुद्ध प्राथमिक, मागास या अर्थाची एक ऐतिहासिक अवस्था असल्याचा चुकीचा अर्थ लावला जातो. पण मार्क्स आणि मार्क्सवाद्यांच्या मते प्राथमिक संचय हा भांडवलशाहीच्या प्रत्येक ऐतिहासिक टप्प्यावर कार्यरत असतो. भूतकाळात भांडवलाच्या प्राथमिक संचयाने विविध रूपे घेतली आहेत. वसाहत हे त्याचे अगदी थेट रूप आहे. प्राथमिक संचयाची प्रक्रिया किती आक्रमक असेल हे त्या त्या काळात आंतरराष्ट्रीय वर्गशक्तींचे संतुलन कसे असेल, वर्गशक्ती संचयामागील भांडवलाच्या पाशवी वृत्तीला मोकळे रान देतात की तिला काबूत ठेवतात, यावर अवलंबून असते. साम्राज्यशाहीच्या सध्याच्या अवस्थेत हा प्राथमिक संचय जास्तच पाशवी बनून हिंस्रपणे विकसित आणि विकसनशील अशा दोन्ही देशांतील जनतेचे जीवन असह्य करून टाकत आहे.

२.१७ सर्व भांडवली जगात, विशेषत: भारतासारख्या विकसनशील देशात, सरकारी क्षेत्राची निर्गंतवणूक आणि त्याचे खासगीकरण या रूपात प्राथमिक संचय केला जात आहे. पाणी आणि ऊर्जा, शिक्षण आणि आरोग्यासारख्या सार्वजनिक सुविधा या वरचेवर खासगी भांडवलाच्या संचयाची साधने बनत आहेत. खनिज संपत्तीवरील नियंत्रण वरचेवर खासगी बनत आहे. शेती वाढत्या प्रमाणात बहुराष्ट्रीय बियाण्यांच्या आणि मार्केटिंग कंपन्यांच्या हवाली करण्यासाठी खुली केली जात आहे. त्यामुळे विकसनशील देशांतील पारंपरिक शेती अक्षरश: नष्ट होऊन शेतकऱ्याची अवस्था अगदीच दयनीय झाली आहे. विकसनशील देशातील व्यापारावरील जकात काढून टाकल्याने आणि त्यांच्यावर मुक्त व्यापार करार लादल्याने ते औद्योगिक दुष्काळात ढकलले जात आहेत. एका बाजूला भांडवलाच्या मुक्त संचाराला वाव दिला जात असताना विकसित देशांतील स्थलांतरविषयक कडक नियमांमुळे शोषण आणि अत्याचार जास्त जास्त तीव्रच होत आहेत. नफा तर कमालीच्या प्रमाणात वाढत आहे. जंगले, खाणी, पाणी आदी सामायिक संसाधनांचे वाढत्या प्रमाणात खासगी मालमत्तेत रूपांतर होत आहे.

२.१८ भांडवलशाहीतील शासनसंस्थेने कोणतेही रूप घेतले तरी ती शेवटी भांडवलदार वर्गाची हुकूमशाहीच असते. आजच्या साम्राज्यशाहीत आंतरराष्ट्रीय वित्त भांडवलाचे हितसंबंध वृद्धिंगत करण्यासाठी शासनसंस्थेची भूमिका बदलत राहते आणि ती बऱ्याचदा वित्त भांडवलाच्या तंत्रानेच चालते. त्यामुळे शासनसंस्था जेव्हा लोकांप्रती असलेल्या सामाजिक जबाबदाऱ्या सोडून देते याचा अर्थ ती आर्थिक व्यवहारातून बाहेर पडते असा नसतो. उलट आंतरराष्ट्रीय वित्त भांडवलाचे हित साधून देण्याचे काम ती बिनदिक्कतपणे करू लागते. या प्रक्रियेत ती आपली सामाजिक जबाबदारी झटकून टाकतेच पण त्याचसोबत लोकशाही संस्थांचे अवमूल्यन करू लागते, लोकांना कायदा करायच्या प्रक्रियेत स्थान असावे या सार्वभौम हक्कावर गदा आणते आणि वरचेवर एकाधिकारी रूप धारण करू लागते.

२.१९ सध्याच्या प्राथमिक संचयाच्या आक्रमक घाल्यामुळे आपल्याला ठाऊक नसलेली दालनेच्या दालने भ्रष्टाचाराला खुली होऊ लागली आहेत. भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमुळे विकसित आणि विकसनशील अशा दोन्ही जगातील कित्येक राजवटी कोसळल्या आहेत. **(५)** भारतात राजरोस चाललेली लूट ही साम्राज्यवादी जागतिकीकरणाच्या तंत्राने राबवण्यात येत असलेल्या नव-उदार सुधारणांनी भ्रष्टाचारासाठी अशी नवी दालने खोलून दिल्यानेच होत आहे.

२.२० भांडवल संचयाच्या दोन्ही प्रक्रिया एकाच वेळी होत असताना भांडवलशाहीतील 'अतिरिक्त मूल्य हस्तगत करायच्या' साधारण आणि स्वाभाविक प्रक्रियेपेक्षा 'लोकांची मालमत्ता बळकावून संचय

करायची' प्रक्रिया जास्त महत्त्वाची बनत आहे हे आजच्या साम्राज्यशाहीचे खास वैशिष्ट्य आहे.

## ३
## नव-उदार जागतिकीकरणातील ठिसूळता आणि भांडवली अरिष्ट

३.१ आपण पक्षाच्या ठरावांमध्ये विश्लेषण केल्याप्रमाणे साम्राज्यवादी जागतिकीकरण हे फार काळ टिकू शकत नाही. तसेच, पक्षाच्या १४व्या परिषदेत केलेल्या ठरावातील समज पुन्हा पक्षाच्या कार्यक्रमात अधोरेखित करण्यात आला आहे. त्यात म्हटल्याप्रमाणे भांडवली व्यवस्था ही शोषणमुक्त अथवा अरिष्टमुक्त असूच शकत नाही, हे मार्क्सचे विश्लेषण सिद्ध झाले आहे. भांडवलशाहीतील अंतर्विरोध त्याच्या मूळ उत्पादन प्रक्रियेतच सामावलेला आहे - उत्पादन सामाजिक असते आणि त्याचा लाभ मात्र व्यक्तिगत पातळीवर घेतला जातो. यामुळे भांडवलशाहीत कितीही सुधारणा केल्या तरी तिला शोषण किंवा अरिष्ट नष्ट करता येतच नसते. तेव्हा भांडवलशाहीला 'मानवी चेहरा' देता येतो हा भ्रम पसरवण्याचा सामाजिक लोकशाहीने कितीही प्रयत्न केला तरी भांडवलशाहीतील शोषण आणि तिचे अरिष्ट यातील अमानुष वास्तव लपू शकत नाही.

३.२ श्रमाचे स्वरूप काय आहे, ते शारीरिक आहेत की बोद्धिक, याचा शोषण प्रक्रियेवर काहीही परिणाम होत नसतो. त्यामुळे मार्क्सच्या काळात असलेले कामगार वर्गाचे स्वरूप (शारीरिक श्रम) आता मोठ्या प्रमाणात बदलले आहे; तसेच, एकूण श्रमातील शारीरिक श्रमाचे प्रमाण त्या काळाहून कमी झाले आहे, या दाव्यात काही तथ्य नाही. जोपर्यंत भांडवली उत्पादन पद्धतीत श्रमशक्ती उत्पादन करत राहील तोपर्यंत तिचे शोषण होतच रहाणार आणि श्रमशक्ती हाच अतिरिक्त मूल्याचा, आणि म्हणूनच भांडवलशाहीच्या अस्तित्वासाठी आवश्यक असलेल्या नफ्याचा, स्रोत रहाणार.

३.३ तथापि, बौद्धिक श्रमाचे प्रमाण ज्या प्रमाणात वाढेल त्या प्रमाणात त्या समाजविभागात आता आपले शोषण होत नसून आपण भांडवलशाहीतील एक 'भागीदार' झालो आहोत, असा भ्रम पैदा होतो. लेनीन 'कामगारांतील उच्चभ्रू' (labour aristocracy) विषयी बोलला होताच. त्यांच्यातील काही विभाग शोषितांच्या वर्गीय एकजुटीत मीठ कालवतानाच अशा भ्रमांना बळी पडून नव-उदार नीतीला बळ देतात. या प्रवृत्तीला वैचारिक आव्हान देऊन तिच्याशी दोन हात करायलाच हवेत.

३.४ हे काही असले तरी आक्रमक नव-उदारवादाने ज्या प्रवृत्तींना जन्म दिला आहे त्याच स्वत: नव-उदार व्यवस्थेला दीर्घकाळ टिकू देणार नाहीत. जागतिकीकरणाच्या दोन वैशिष्ट्यांमधून हे अगदी स्पष्ट होते. एक तर, या प्रक्रियेमुळे सर्व देशांमधील गरीब व श्रीमंत यांच्या दरम्यान तसेच, विकसित आणि विकसनशील देशांच्या दरम्यान आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. **(६)** दुसरे म्हणजे, जागतिकीकरणाने 'बिन-रोजगाराची वाढ' (jobless growth) हा नवा प्रकार जन्माला घातला आहे. हे असे होऊ शकते याचे कारण जास्तीत जास्त नफा कमावण्याचे तर्कशास्त्र मानवी क्षमतांचा विकास करण्याऐवजी मानवी श्रमाची जागा घेणारे तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर देते. या कालात जगातील रोजगारातील वाढ ही एकूण घरेलू उत्पादनाच्या वाढीहून कमीच राहिली आहे. **(७)** वाढत जाणारी विषमता आणि बिन-रोजगाराची वाढ हे दोन्ही घटक एकत्र ठेवले की जगात बहुसंख्येने असलेल्या काम करणाऱ्या जनतेची क्रयशक्ती कशी कमी कमी होत आहे, हे दिसून येते.

३.५ उत्पादन केलेल्या वस्तू विकल्या गेल्या नाहीत की अतिरिक्त मूल्याचे रूपांतर नफ्यात होऊ शकत नाही. त्यामुळे भांडवलशाही अटळपणे अरिष्टाच्या भोवऱ्यात सापडते. साम्राज्यशाहीच्या आजच्या जागतिकीकरणाच्या अवस्थेत अशी अरिष्टे वेगवेगळ्या रूपात येत रहाणारच. **(८)** त्यामुळे ही अवस्था फार काळ टिकू शकत नाही. जेव्हा जेव्हा अरिष्ट भेडसावते तेव्हा तेव्हा भांडवलशाही आपल्या स्वभावानुसार विविध मार्गांनी त्यावर मात करायचा प्रयत्न करत रहाते. त्यामुळे भांडवलशाही तत्कालीन अरिष्टातून तात्पुरती बाहेर आली तरी भविष्यातील याहून तीव्र अशा अरिष्टासाठी पाया

घालत रहाते.

३.६ अशा परिस्थितीत भांडवलशाही नफ्याची पातळी आणि विस्तार वाढवण्यासाठी एक मार्ग चोखाळते - लोकांना कर्ज घ्यायला लावून त्यांची क्रयशक्ती वाढवणे. पण हे कर्ज फेडायची वेळ आली की पंचाईत होते. बहुसंख्य कर्जदारांची आर्थिक स्थिती खालावली असल्याने ते कर्जबाजारी होऊन जातात. अमेरिकेत झाले ते हेच. त्यातून निर्माण झालेल्या अरिष्टाच्या वादळाने जगालाच वेढून टाकले आणि आर्थिक दिवाळखोरीने सर्वत्र थैमान घातले. **(९)**

३.७ हे एवढ्यावर थांबत नाही. जास्त जास्त नफा कमावण्याच्या हव्यासापोटी भांडवल नवनव्या क्रयवस्तू निर्माण करून आपली बाजारपेठ विस्तारत रहाते. मार्क्सने म्हटल्याप्रमाणे, " उत्पादन केवळ उपभोक्त्यांसाठी वस्तू निर्माण करून थांबत नाही तर वस्तूंसाठी उपभोक्ते देखील निर्माण करत असते." **(१०)** आंतरराष्ट्रीय वित्त भांडवलाच्या अधिपत्त्याखाली भांडवलशाही नफ्याचा विस्तार करण्यासाठी सट्टेबाजीच्या बाजारपेठेत वित्तीय क्रयवस्तू (financial commodities) निर्माण करत असते. अशा वित्तीय क्रयवस्तूंपैकी एक, आणि जिने जगभरात हाहा:कार माजवला अशी, क्रयवस्तू म्हणजे 'derivatives'. **(११)**

३.८ भांडवली व्यवस्थेला अशा रीतीने काहीही किंमत मोजून जास्तीत जास्त नफा कमावण्याच्या वेडाने झपाटलेले असते. भांडवलशाहीचा हा रोग कुणा एकाच्या हव्यासापोटी अथवा नियंत्रक अधिकाराच्या कमकुवतपणामुळे निर्माण झालेला नसतो. तो भांडवलाचा अविभाज्य भाग असतो. आणि नफ्याचे वेड हेच सध्याच्या अरिष्टाचे मूळ कारण आहे.

३.९ नफा जर उत्पादनाच्या क्षमता वाढवण्यासाठी वापरला तर त्यातून नवा रोजगार निर्माण होईल, त्यातून लोकांची क्रयशक्ती वाढेल. क्रयशक्तीत भर पडल्याने एकूण मागणी वाढेल आणि ती मागणी भागवण्यासाठी औद्योगिकरणाला आणि अर्थव्यवस्थेच्या खऱ्या वाढीला चालना मिळेल. म्हणजेच विस्तारातून संचय आणि त्यातून नफाप्राप्ती होत राहील. पण असे करण्याऐवजी महा-नफ्याच्या शोधात असलेले आंतरराष्ट्रीय वित्त भांडवल या उत्पादन चक्राच्या बाहेर जाऊन सट्टेबाजीच्या नवनव्या पेठा धुंडाळत राहते.

३.१० त्यामुळे जागतिकीकरणात जगातील बहुसंख्य लोकांच्या हातातील क्रयशक्ती मोठ्या प्रमाणात कमी होते आणि जलद नफा मिळवण्यासाठी वित्त भांडवल सट्ट्याचा मार्ग अवलंबत लोकांना स्वस्त कर्जे पुरवते. पण त्यातून निर्माण होतात केवळ 'बुडबुडे'. आता या कर्जातून मिळालेले पैसे लोकांनी खर्च केले की नफा कमावला जातो. पण हे कर्ज फेडायची पाळी आली की माणसांचे दिवाळे निघून ते बरबाद होतातच पण खुद्द व्यवस्थेलाच पक्षाघात होतो. आताच्या जागतिक भांडवलशाहीतील अरिष्टात झाले ते नेमके हेच.

३.११ बलशाली राजकीय पर्याय नसल्याने भांडवलशाही या अरिष्टातून बाहेर पडेल खरी; पण बाहेर पडत असताना भांडवलाच्या प्राथमिक संचयाच्या प्रक्रियेत शोषण जास्तच तीव्र होत राहील. आज साम्राज्यशाही सर्व क्षेत्रात जी इतकी आक्रमक झालेली दिसते ती याच कारणाने.

३.१२ आज वारंवार उद्भवणाऱ्या अरिष्टांची मालिका उलगडत आहे असे दिसून येते. भांडवली शासनसंस्थेने, आपल्या स्वभावाला धरून, मुळात ज्यांनी हे अरिष्ट जगावर लादले त्यांनाच मदतीचे महा-पॅकेज देऊन या अरिष्टावर मात करायचा प्रयत्न केला. याचा त्या वित्तीय महाकंपन्यांनी लाभ उठवून महानफे मिळवायला सुरवात केली. **(१२)** त्या कंपन्यांना पॅकेज देण्यासाठी भांडवलशाही देशांच्या सरकारांना मोठमोठी कर्जे काढून ते ओझे अंगावर घ्यावे लागले. भांडवलशाहीने आपल्या स्वभावाला जागून नफ्याला केवळ संरक्षण दिले नाही तर त्यात महाभयानक वाढ करून द्यायची तजवीज केली, आणि तीसुद्धा सरकारच्या डोक्यावर भलीमोठी कर्जे लादून. अशा रीतीने कार्पोरेट कंपन्यांची दिवाळखोरी सरकारांच्या अंगावर ढकलून दिली. युरोपियन युनियनमधील कित्येक देशांवर आणि खुद्द

अमेरिकेवर या कर्माची फळे भोगायची पाळी आली आहे.

३.१३ या देशांच्या माथी आलेल्या दिवाळखोरीचे ओझे भांडवलशाही आपल्या स्वभावाला धरून कामगार वर्ग आणि इतर काम करणाऱ्या सामाजिक विभागांवर ढकलत आहे. **(१३)** या कर्जाची परतफेड करायला पैसा उपलब्ध व्हावा म्हणून सरकारी खर्च कमी करायच्या नावाखाली कामगार आणि इतर कामकऱ्यांवर त्यांचे हक्क हिरावून घेणारे "काटकसर पॅकेज" लादले जात आहे. अशा रीतीने भांडवलशाही पुन्हा या अरिष्टातून बाहेर पडू पहात आहे ती लोकांचे शोषण आणखी तीव्र करून.

३.१४ पण भांडवलशाहीच्या या प्रयत्नातून पुढच्या अधिक सखोल अशा अरिष्टाची बीजे रोवली जात आहेत, आणि हे अरिष्ट सुरू झाल्याची दुष्चिन्हे दिसूही लागली आहेत. या काटकसरीच्या उपायांमुळे बेरोजगारी एकदम वाढून लोकांची क्रयशक्ती मोठ्या प्रमाणात घटत असते. त्यामुळे मंदीची परिस्थिती झपाट्याने तयार होऊ लागली आहे. **(१४)**

३.१५ तथापि, आधी म्हटल्यानुसार, अरिष्ट कितीही तीव्र झाले तरी, भांडवलशाही आपोआप कोसळत नसते. याबाबतीत मार्क्सने काय म्हटले आहे ते आठवूया: प्रत्येक अरिष्टाच्या वेळी भांडवलशाही अस्तित्वात असलेल्या उत्पादक शक्ती आणि आणि उत्पादन संबंध यांच्यातील संतुलन राखण्यासाठी उत्पादक शक्तींचा काही भाग नष्ट करून त्या अरिष्टातून केवळ बाहेर पडत नाही तर ती जास्तच बलशाली होते. या प्रक्रियेत शोषण जास्त तीव्र होत जाते.

३.१६ यासाठी भांडवलशाहीच उलथून टाकायला हवी. पण हे कामगारवर्गाच्या नेतृत्वाखाली समाजातील भौतिक शक्ती "भांडवलाच्या सत्तेचा" अंत करण्यासाठी वर्ग संघर्ष तीव्र करून राजकीय हल्ला चढवतात की नाही यावर निर्णायकरित्या अवलंबून असते. ही भौतिक शक्ती आणि तिचे बळ हा क्रांतीचा "आत्मनिष्ठ घटक" असतो. क्रांतीतला अरिष्टाची ठोस परिस्थिती हा "वस्तुनिष्ठ घटक" कितीही आवश्यक असला तरी "आत्मिक घटक" बलशाली केल्याशिवाय वस्तुनिष्ठ घटकाचे रूपांतर भांडवलाच्या सत्तेवरील क्रांतीकारक हल्ल्यात करणे शक्य नसते.

३.१७ “आत्मनिष्ठ घटक" बळकट करण्यासाठी कामगार वर्गाला वेळोवेळी प्रासंगिक घोषणा करत आणि डावपेच लढवत वर्ग संघर्ष टोकदार करावा लागतो. अशा रीतीनेच प्रत्येक देशातील कामगारवर्गाला आपापल्या देशातील क्रांतीची प्रक्रिया पुढे नेता येत असते.

## ४
## साम्राज्यवादी जागितिकीकरणाचे राजकारण आणि विचारसरणी

४.१ आंतरराष्ट्रीय वर्गशक्तींचे संतुलन साम्राज्यशाहीच्या बाजूने झुकल्यानंतर अमेरिकेने घोषित केलेली तीन उद्दिष्ट्ये साध्य करण्याच्या दिशेने आगेकूच करायला सुरवात केली आहे.

४.२ पहिले उद्दिष्ट आहे उरलेल्या समाजवादी राष्ट्रांचा अंत घडवणे; वसाहतींचा अंत झाल्यावर सुरू झालेल्या गटनिरपेक्ष आंदोलन घडवून आणणाऱ्या देशांच्या राष्ट्रवादाची धार बोथट करणे; आणि शेवटी सर्व जगावर, आणि विशेषत: स्पर्धक होऊ शकणाऱ्या देशांवर, निर्णायक लष्करी आणि आर्थिक प्रभुत्व लादणे.

४.३ नवी जागतिक व्यवस्था सर्व क्षेत्रात लादण्याचे घाटते आहे. **(१५) इ**राकवर लष्करी आक्रमण करून तो देश ताब्यात घेणे हा याच प्रक्रियेचा एक भाग होता. अमेरिकेची लष्करी यंत्रणा अतिशय मजबूत करणे हा दुसरा. **(१६)** खरे तर शीतयुद्धानंतर नाटोची गरज संपायला हवी होती. पण जगभर युद्ध लादण्यासाठी साम्राज्यशाहीचे लष्करी यंत्र म्हणून ते जास्तच बळकट करण्यात आले आहे. **(१७)**

४.४ आपले निरंकुश श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्यासाठी आणि नंतर ते कायम करण्यासाठी अमेरिकन साम्राज्यशाही जगातील आर्थिक संसाधनांवर, ऊर्जास्रोतांवर, विशेषत: तेलावर, वाढता ताबा मिळवत गेली. (१८) यासाठीच ती पश्चिम आशिया सोडायला तयार नाही. पश्चिम आणि मध्य आशियातील तेल आणि नैसर्गिक वायूवर ताबा ठेवण्यासाठी अमेरिकेच्या दृष्टीने अफगाणिस्तानला मध्यवर्ती महत्व आहे. (१९) यासाठी या भागावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने इस्रायलला लष्करी टेकू देऊन उभे ठेवणे आणि हा प्रदेश सतत खदखदत ठेवणे अमेरिकेला आवश्यक आहे. या भागातील संसाधनांवर ताबा मिळवण्यासाठी 'सरकार बदल' या तंत्राचा वापर साम्राज्यशाही करत आहे.

४.५ 'अरब वसंतात' साम्राज्यशाहीने पाठबळ दिलेल्या वा तिची बाहुले असलेल्या सत्तांविरुद्ध ट्युनिशिया, इजिप्त येमेन आणि इतर देशांतील जनतेने उठाव केले. त्या जनतेला असलेल्या लोकशाही, नागरी स्वातंत्र्य आणि चांगले जीवनमान याविषयीच्या आकांक्षांचे ते निदर्शक होते. लिबियात केले त्याप्रमाणे साम्राज्यशाही उघड हस्तक्षेप करत आहे. तसेच, सौदी अरेबियाने बाहरिनमध्ये केलेल्या हस्तक्षेपाची उघड पाठराखण करत आहे. या विभागातील आपले काही विश्वासू साथीदार दूर गेल्याने आपल्या अंकित राहतील अशा नव्या सत्ता ती बसवायचा प्रयत्न करत आहे. या घटना उलगडत जातील तसतसे साम्राज्यशाहीच्या पोटातील अंतर्विरोध या विभागात जास्त जास्त तीव्र होत जातील.पश्चिम आशियातील इराण, तुर्कस्तान आणि सीरियासारख्या राजवटी आपला या विभागात प्रभाव वाढवण्यासाठी स्वत:चे स्थान भक्कम करत आहेत.

४.६ एक मात्र लक्षात ठेवायला हवे. साम्राज्यशाहीला जेथे जेथे सत्ताबदल करण्यात यश आले तेथे तेथे साम्राज्यशाहीने पद्धतशीरपणे डाव्या आणि पुरोगामी शक्तींवर हल्ले करून अतिउजव्या, आणि बऱ्याचदा अतिरकी धर्मवादी, शक्तींना रान खुले करून दिले. डाव्या आणि पुरोगामी शक्तीच अस्सल आणि सातत्यपूर्ण साम्राज्यशाही विरोधी ताकद असल्याने या शक्ती दुर्बल करणे हे साम्राज्यशाहीचे जाहीर उद्दिष्ट आहेच. साम्राज्यशाही आणि मुस्लीम मूलतत्ववादी डाव्या शक्तींना दुर्बल करण्यासाठी एकत्र येतात. अमेरिकेच्या इराकमधील लष्करी हस्तक्षेपामुळे शिया-सुन्नीमधील दरी आणखी खोल आणि विस्तीर्ण झाली असून त्या समाजाचे धर्मनिरपेक्ष स्वरूप नष्ट केले आहे. त्याआधी अमेरिकेने इराणमध्ये तेलावर नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने शहाला सत्तेवर बसवले आणि कम्युनिस्ट आणि पुरोगामी राष्ट्रवाद्यांवर पाशवी दडपशाही करून इस्लामी धर्मगुरूंना प्रमुख विरोधी शक्तीची जागा घ्यायला मदत केली. अफगाणिस्तानात तत्कालीन सोव्हिएत युनियनच्या सहाय्याने सत्तेवर असलेली पुरोगामी राजवट उलथून टाकण्यासाठी अमेरिकेने मुजाहिद्दीन-तालिबान-ओसामा बिन लादेन हा तीन तोंडाचा राक्षस जन्माला घातला. आता अरब जगात आलेल्या "अरबी वसंत" ऋतुमुळे या भागातील काही देशांमध्ये असेच नवे राक्षस निर्माण होण्याचा धोका दिसू लागला आहे.

४.७ जगावर आपली एककेंद्री व्यवस्था लादण्यासाठी साम्राज्यशाही अगदी आक्रमक अशा विचारसरणीचे सहाय्य घेत आहे. साम्राज्यशाहीच्या दृष्टीने मुक्त बाजारव्यवस्था म्हणजेच लोकशाही. या अर्थाच्या लोकशाहीच्या नावाने साम्राज्यशाही ज्या सत्ता तिचे प्रभुत्व नाकारतात, नव-उदार आर्थिक सुधारणांना आव्हान देतात अथवा "मुक्त बाजारपेठ" स्वीकारत नाहीत अशा राजवटीत लष्करी आणि राजकीय हस्तक्षेप करत रहाते.

४.८ साम्राज्यशाही तथाकथित "मानवी हक्क" आणि "वैश्विक मूल्यांचे" रक्षण करायच्या नावाखाली स्वतंत्र आणि सार्वभौम देशांमध्ये लष्करी हस्तक्षेप करते. स्वत: लष्करी हस्तक्षेपाने केलेल्या मानवी हक्कांच्या उल्लंघनावर बेशरमपणे पांघरूण घालून साम्राज्यशाहीने याच मुद्द्यावर पूर्वाश्रमीच्या युगोस्लाव्हियाचे तुकडे केले. एरव्ही राष्ट्रीय सार्वभौमत्वाचे कोडकौतुक करणारा विकसित भांडवली देशांतला भांडवलदार वर्ग तथाकथित "मानवी हक्कांचे" संरक्षण करायच्या नावाखाली देशांच्या सार्वभौमत्वावर टाच आणायला मागेपुढे पहात नाही.

४.९ न्यू यॉर्कमधील वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील ९/११ च्या हल्ल्यानंतर अमेरिकेच्या नेतृत्वाखाली तथाकथित "दहशतवादाविरुद्धचे जागतिक युद्ध" छेडण्यात आले. त्याचे निमित्त करून अफगाणिस्तान आणि इराकचे राष्ट्रीय सार्वभौमत्व पायदळी तुडवण्यात आले. तेथे साम्राज्यशाहीचे हितसंबंध सांभाळणाऱ्या राजवटी, “बदलाच्या" नावाखाली बसवण्यात आल्या. आता इराणमध्येही तोच प्रयोग करायची धमकी दिली जात आहे. साम्राज्यशाहीने लादलेला शासनसंस्थेचा दहशतवाद आणि मूलतत्ववाद्यांचा वैयक्तिक दहशतवाद परस्परांना खतपाणीच घालत असतात. या दोन्हींशी परिणामकारक मुकाबला केल्याशिवाय दहसातवादाविरुद्धची लढाई यशस्वी होऊ शकत नाही. ज्याप्रमाणे शीतयुद्धाच्या कालखंडात "कम्युनिझम विरुद्ध लढाई"च्या नावाखाली जगभर साम्राज्यवादी लष्करी हस्तक्षेप करण्यात आले त्याप्रमाणेच आता स्वतंत्र देशांचे सार्वभौमत्व आणि त्या त्या देशांतील जनतेचे मूलभूत मानवी हक्क पायदळी तुडवण्यासाठी "दहशतवादाविरुद्धच्या लढाई"चा बिनदिक्कत वापर केला जात आहे.

४.१० साम्राज्यशाहीने कम्युनिझमविरुद्ध 'कम्युनिझम म्हणजे फॅसिझम, हुकूमशाही अशी अत्यंत विखारी प्रचार मोहीम उघडली आहे. युरोपियन संसद कम्युनिझमची गणना फॅसिझममध्ये करणारे कायदे करू पहात आहे. चेक गणराज्य, पोलंड आदी कित्येक पूर्व युरोपियन देशांमध्ये कम्युनिस्ट चिन्हे आणि कार्यावर कायद्याने बंदी घालण्यात आली आहे.

४.११ समाजवादाला एकाधिकारवादी आणि मानवी हक्क आणि वैश्विक मानवी मूल्यांच्या विरोधी ठरवले जात आहे. तथाकथित मानवी हक्कांचे उल्लंघन आणि व्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी अशा मुद्द्यांवरून समाजवादी देशांविरुद्ध वैचारिक आघाडी उघडण्यात आली आहे. याचेच निमित्त करून अमेरिकन साम्राज्यशाहीने क्युबाची गुन्हेगारी स्वरूपाची आर्थिक नाकेबंदी केली आहे.

४.१२ या कालखंडात साम्राज्यशाही आणि नव-उदारवादाचे बौद्धिक आणि सांस्कृतिक वर्चस्व लादण्यासाठी या शक्तींनी आक्रमक वैचारिक युद्ध पुकारले आहे. जागतिकीकरणाची प्रक्रिया आणि अत्यंत उच्च पातळीवर विकसित झालेले तंत्रज्ञान यांचा उपयोग करून माहिती, **संवाद** आणि मनोरंजन (information, communications and entertainment – ICE) यांचे तंत्रज्ञान महाकाय कॉर्पोरेशन्समध्ये एकत्रित झाले आहे. (२०) मानवी बौद्धिक व्यवहारावरील मक्तेदारी आणि कार्पोरेट प्रसारमाध्यमांचे माहिती प्रसृत करण्यावरील नियंत्रण हे या कालखंडाचे वैशिष्ट्य आहे. याचा वापर करून भांडवलशाहीची समीक्षा करण्याच्या अथवा त्याला पर्याय देण्याच्या कसल्याही प्रयत्नांवर सातत्याने वैचारिक हल्ले चढवले जातात. लोकांच्या आवडी निवडी, त्यांची रुची एककल्ली, सरधोपट, सपाट करून जागतिकीकरण आपले सांस्कृतिक वर्चस्व निर्माण करू पहाते. लोकांची रुची जितकी एककल्ली आणि सरधोपट असेल ते जागतिकीकरणाला सोयीचे असते. तशी रुची भागवण्यासाठी "सांस्कृतिक उत्पादनांचे" यांत्रिक पुनरुत्पादन करायचे तंत्र विकसित करणे सोपे असते. संस्कृतीचे बाजारीकरण हे जागतिकीकरणाचेच अपत्य आहे. जागतिकीकरणाची संस्कृती लोकांना त्यांच्या दैनंदिन जीवनाच्या वास्तवापासून तोडून टाकते. आता संस्कृती सौंदर्याचा अनुभव देत नाही, तर पण दारिद्र्य आणि दैन्य यांनी निर्माण केलेल्या प्रश्नांना बगल देणारी पळवाट बनते.

४.१३ मानवाची क्रांतीकारी प्रगती साधायची असेल तर साम्राज्यशाहीने आपले प्रभुत्व टिकवण्यासाठी सुरू केलेल्या या वैचारिक हल्ल्याला निर्धाराने प्रत्युत्तर दिलेच पाहिजे.

## ५

## संक्रमणाचा कालखंड आणि आजची जागतिक भांडवलशाही

५.१ १४व्या पक्ष परिषदेने केलेल्या "**काही वैचारिक प्रश्नांविषयी**" या ठरावात सोव्हिएत युनियन आणि पूर्व युरोपातील समाजवादी देशांच्या पतन झाले असले तरी त्यामुळे मार्क्सवाद-लेनीनवाद आणि समाजवादी आदर्श नाकारले गेले आहेत, असा म्हणता येत नाही, असा निष्कर्ष काढला होता. तसेच,

समाजवादाने मानवी संस्कृतीचा स्तर अभूतपूर्व रित्या उंचवण्यास केलेले योगदान या पीछेहाटीमुळे पुसून जाणे शक्य नाही, असेही म्हटले होते.(२१)

५.२ विसाव्या शतकात समाजवादाने अभूतपूर्व प्रगती करून मानवी संस्कृतीला एक नवी मळवाट घालून दिली हे खरे असले तरी एक गोष्ट विसरता कामा नये. पूर्व युरोपातील काही मोजके अपवाद सोडता समाजवादी क्रांत्या झाल्या त्या तुलनेने मागास असलेल्या भांडवली देशांत. समाजवादी देशांनी जगातील १/३ बाजारपेठ भांडवलशाहीच्या ताब्यातून सोडवून घेतली. अर्थात, त्यामुळे ना भांडवलशाहीने केलेल्या विकासावर काही लक्षणीय परिणाम झाला, ना तिच्या वैज्ञानिक-तांत्रिक प्रगतीच्या पायावर उत्पादक शक्ती अजून विकसित करायच्या क्षमतेवर. त्यामुळे २०व्या शतकातील समाजवादी क्रांत्यांमुळे फटका बसला तरी जागतिक भांडवलशाही या पीछेहाटीवर मात करून उत्पादक शक्तींचा विकास करून भांडवली बाजारपेठेचा विस्तार करू शकली. तत्कालीन आंतरराष्ट्रीय वर्गसंतुलनाचा फायदा घेत साम्राज्यशाहीने नव-वसाहतवादाच्या सहाय्याने भांडवली बाजारपेठेचा विस्तार करण्यात यश संपादन केले.

५.३ दुसऱ्या बाजूला समाजवादाने अगदी अल्पावधीत वेगवान आणि गुणवत्तापूर्ण प्रगती करून दाखवली होती. हे प्रगतीचे चाक आता उलटे फिरणे अशक्य असल्याचा समज झाला होता. पराजित झालेला भांडवलदार वर्ग शंभर पट शक्तीने प्रतिहल्ला करील, हा लेनीनने दिलेला इशारा नजरेआड करण्यात आला.

५.४ जागतिक भांडवलशाहीची क्षमता कमी लेखणे आणि समाजवादाच्या ताकदीचे अतिशयोक्त मूल्यमापन या दोन्ही प्रवृत्तींचे प्रतिबिंब जागतिक कम्युनिस्ट आंदोलनात उमटले होते. १९६० मध्ये ८१ कम्युनिस्ट पक्षांनी भांडवलशाहीत आलेल्या "सार्वत्रिक अरिष्टाच्या तिसऱ्या चक्रामुळे" भांडवलशाहीचे पतन जवळ आल्याचा निष्कर्ष काढणारे निवेदन प्रसृत केले होते. या आकलानातील गंभीर चुकीचा जागतिक समाजवादाच्या प्रगतीत मोठा अडसर निर्माण झाला होता. या चुकीच्या आकलनाचे आपल्या पक्षाच्या १४व्या परिषदेत पुनर्मूल्यमापन करण्यात आले होते.

५.५ समाजवाद ही एकरेषीय, एकाच दिशेने जाणारी प्रक्रिया आहे असे मानले जाई. एकदा का समाजवाद आला की पुढे सरळ दिशेने, विना अडथळा वर्गविहीन, साम्यवादी समाज निर्माण होईल असा समज होता. समाजवाद ही एक संक्रमणाची अवस्था आहे, किंवा मार्क्स म्हणतो त्याप्रमाणे साम्यवादाची पहिली पायरी आहे - तो वर्गीय, शोषक भांडवली व्यवस्था आणि वर्गविहीन साम्यवादी अवस्था यांच्या मधला कालखंड आहे - हे अनुभवांती सिद्ध झाले आहे. संक्रमण काळाच्या व्याख्येनुसारच या कालखंडात जागतिक भांडवलशाही आपल्या ताब्यातून गेलेली भूमी परत बळकावण्याचा प्रयत्न करत राहिल्याने वर्गसंघर्ष नष्ट होत नाही तर तो जास्त तीव्र होतो. त्यामुळे समाजवादाचा हा संक्रमण काळ खूप गुंतागुंतीचा आणि प्रदीर्घ होता आणि त्यात किती तरी वेडीवाकडी वळणे येऊन गेली. ज्या देशांतील भांडवलशाही समाजवादी क्रांतीच्या वेळी मागासलेली होती अशा देशात अशी गुंतागुंत विशेषत्वाने आढळून आली. (२२)

५.६ संक्रमण काळात समाजवादाला यश आले की अपयश हे ठरवायचे तर (२३) समाजवादाच्या बांधणीत कितपत यश आले याबरोबरच आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत वर्गशक्तींचे संतुलन कसे होते याचेही योग्य मूल्यमापन करणे आवश्यक असते. अयोग्य मूल्यमापन करून समाजवादी देशातील आणि बाहेरील अशा दोन्ही वर्ग शत्रूंच्या शक्तीचा योग्य अंदाज घेता न आल्याने आणि समाजवादाच्या शक्तीचे अतिशयोक्त मूल्यमापन केल्याने समाजवादी देशांसमोरील प्रश्नांकडे दुर्लक्ष झाले; तसेच भांडवलशाहीचे बसलेले बस्तान आणि तिने केलेला विकासही नजरेआड करण्यात आला.

५.७ २१व्या शतकात आपण सोव्हिएत युनियन आणि पूर्व युरोपातील समाजवादाच्या अमूल्य अनुभवापासून धडे गेतले पाहिजेत, हे खरे असले तरी २१व्या शतकात भांडवलशाहीतून समाजवादाकडे

घडवून आणायचे संक्रमण ही जुन्या अनुभवांची पुनरावृत्ती असणार नाही, हे स्पष्ट आहे.

५.८  २०व्या शतकातील समाजवादाच्या प्रेरणेने जगभर सुरू असलेल्या लोकसंघर्षांतून एक अमीट ठसा उमटला आहे. या संघर्षांमुळे लोकशाही हक्क आणि नागरी स्वातंत्र्य यांचा विस्तार झाला आहे. उदाहरणार्थ, स्त्रियांना मिळालेला मतदानाचा अधिकार. त्याचसोबत कामगारवर्गाला आणि इतर कष्टकऱ्यांना यापूर्वी कधीही न मिळालेले सामाजिक सुरक्षेचे कल्याणकारी फायदे देणे भांडवलशाहीला भाग पडले. त्यामुळे आज "वैश्विक" म्हणून गणले गेलेले हक्क "भांडवलदारा वर्गाच्या दयेने" मिळाले नसून लोकसंघर्षातून मिळाले आहेत.

५.९  २१ शतकात समाजवादी संक्रमण आणि परिवर्तन व्हायचा कालखंड अनिवार्य असला तरी प्रदीर्घ लढ्याचाच असणार आहे. वर्गसंघर्ष तीव्र करून संक्रमणाची प्रक्रिया आपापल्या देशात वेगवान करणे हे सर्व कम्युनिस्टांचे, कामगारवर्गाचे आणि सर्व पुरोगामी शक्तींचे काम आहे. अटळ अंत पुढे ढकलण्याचा साम्राज्यशाही आतोकाट प्रयत्न करत राहील, हे ध्यानात घेऊनच या कार्यात उतरले पाहिजे.

५.१०  २१व्या शतकातील समाजवादासाठी करायचा संघर्ष हा माणूस माणसाचे आणि देश देशाचे करत असलेले शोषण नष्ट करायचा संघर्ष आहे. ही शोषणविरहित व्यवस्था लोकांचे लोकशाही हक्क आणि नागरी स्वातंत्र्याच्या बळकट पायावर उभी असेल. या व्यवस्थेने उत्पादकता आणि उत्पादक शक्तींचा विकास याबाबतीत भांडवलशाहीवर श्रेष्ठत्व प्रस्थापित केले पाहिजे. “क्षमतेनुसार काम आणि कामानुसार दाम" या तत्वापासून संक्रमण होत त्याचे परिवर्तन "प्रत्येकाला गरजेनुसार" हे तत्व अंमलात आणणाऱ्या साम्यवादी व्यवस्थेत होईल. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आदि जगण्याच्या सर्व क्षेत्रात लोकांचा सहभाग संपूर्ण सहभाग घडवून ही व्यवस्था भांडवलशाहीहून श्रेष्ठ आहे हे दाखवून दिले पाहिजे.

५.११  १४व्या पक्ष परिषदेने समाजवादातील लोकशाही, मालमत्तेची रूपे, आणि नियोजन आणि बाजारपेठ यांच्यातील नाते याविषयीचा आपला दृष्टिकोन स्पष्ट केला आहे. यातील बऱ्याच बाबी आपण पक्षाच्या अद्यावत केलेल्या कार्यक्रमात समाविष्ट केलेल्या आहेत. त्यांचे आपल्याला मार्गदर्शन होतच राहील.

५.१२  समाजवादामध्ये शासकीय मालकीचे क्षेत्र अत्यंत महत्वाचे असते हे खरे; पण उत्पादन साधनांची सामाजिक मालकी याचा अर्थ यांत्रिकपणे शासकीय मालकीचे क्षेत्र असा घेतला जाऊ नये. मालमत्तेची विविध रूपे अस्तित्वात असली तरी आर्थिक जीवनरेखा ही शासनाच्या नियंत्रणात राहील अशीच तजवीज केली पाहिजे. थोडक्यात, भांडवलशाहीत 'राजकारण कसे असावे हे अर्थकारण (नफ्यातील वाढ) ठरवते'; २१व्या शतकातील समाजवादात 'अर्थकारण कसे असावे हे राजकारण ठरवेल'.

जगातील सामाजिक अंतर्विरोध

५.१३  साम्राज्यशाहीच्या सध्याच्या अवस्थेतील संक्रमणकालात जगाच्या विविध भागांतील आणि विविध क्षेत्रातील अंतर्विरोध वेगवेगळया प्रमाणात तीव्र होत जातील. भांडवलशाहीतील श्रम आणि भांडवल यांच्यातील मूलभूत अंतर्विरोध सध्याच्या अरिष्टाच्या आणि मंदीच्या परिस्थितीत वरचेवर तीव्र होत आहे. साम्राज्यशाही एका बाजूला जगावरील आपले प्रभुत्व वाढवत आहे आणि दुसऱ्या बाजूला विकसनशील देशांतील सत्ताधारी वर्गांना आपल्या अधिपत्याखाली आणत आहे. यामुळे साम्राज्यशाही आणि विकसनशील देशांमधील जनता यांच्यातील अंतर्विरोधही तीव्र बनत आहे. आज काहीसे सुप्त दिसत असले तरी साम्राज्यशाहीच्या अंतर्गत अंतर्विरोधही हळू हळू तीव्र होत आहेत. या संक्रमण कालातील मध्यवर्ती अंतर्विरोध साम्राज्यशाही आणि समाजवाद यांच्यातच आहे. हा मध्यवर्ती अंतर्विरोध कायम राहून यापैकी कोणताही अंतर्विरोध, विशिष्ट परिस्थितीत, पुढे येऊ शकतो.

५.१४  समाजात कोणत्याही क्षणी कित्येक अंतर्विरोध अस्तत्वात असतात, हे खरे असले तरी जागतिक

कम्युनिस्ट चळवळीच्या दृष्टीने सध्याच्या संक्रमणकालाच्या स्वरूपावर आणि त्याच्या गतीवर प्रभाव टाकणारे हे चार अंतर्विरोधच जगातील प्रमुख सामाजिक अंतर्विरोध आहेत. पण अलिकडच्या काळात भांडवलशाहीच्या सामाजिक उत्पादन आणि खासगी स्वामित्व या मूलभूत अंतर्विरोधाचे प्रत्यंतर जागतिक पर्यावरणाच्या होत असलेल्या विनाशामधून जास्तच स्पष्ट होत आहे. प्रचंड नफा कमावण्याच्या हव्यासापोटी साम्राज्यवादी जागतिकीकरणाच्या कालखंडात तर हा अंतर्विरोध पर्यावरणाचा कडेलोट करू पहात आहे. जागतिक तापमानातील गंभीर बदलांमुळे मानवाच्या अस्तित्वालाच धोका उत्पन्न झाला आहे. या समस्येने आणखी एक अंतर्विरोध जास्तच तीव्र केला आहे. तो आहे साम्राज्यशाही आणि विकसनशील देशांमधील. जागतिक तापमानातील वाढ रोखण्याचे आणि हरितगृह वायु कमी करण्याचे संपूर्ण ओझे साम्राज्यशाही विकसनशील देशांवर लादू पहात आहे. खरे तर पर्यावरणातील असंतलन दूर करायची प्रमुख जबाबदारी विकसित औद्योगिक देशांची आहे. सर्व देशांच्या चर्चांमध्ये सर्वांनी "सामुदायिक पण विशिष्ट" जबाबदारी स्वीकारायचे ठरवले. पण प्रचंड नफे कमावण्याच्या लालसेपोटी विकसित देश ही जबाबदारी टाळत आहेत. प्रत्येक माणसाला समान "कर्बावकाश" मिळणे हा मूलभूत हक्क आहे. हा हक्क विकसित, भांडवली देश नाकारत आहेत. वर्गीय शोषण तीव्र करण्यासाठीच भांडवलशाही पर्यावरण दुरूस्तीचे ओझे विकसनशील देशांवर लादत आहेत. या प्रयत्नांविरुद्ध विकसनशील देश करत असलेला संघर्ष हा जागतिक भांडवलशाहीविरुद्धच्या आंतरराष्ट्रीय वर्गसंघर्षाचा एक महत्वाचा भाग आहे.

५.१५ अशा परिस्थितीत जगातील सर्व देशातील जनतेने आपले भवितव्य घडवण्यासाठी आजच्या आव्हानांचा मुकाबला केला पाहिजे. ही आव्हाने स्वीकारताना लोकलढे किती बलशाली होतात, सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यात या लढ्यांना किती यश येते यावर प्रस्तुतच्या संक्रमणाची गती अवलंबून आहे.

## ६
## समाजवादी देशांतील घडामोडी

६.१ आंतरराष्ट्रीय वर्गशक्तींचे संतुलन साम्राज्यशाहीच्या बाजूने झुकल्याच्या या काळात आंतरराष्ट्रीय वित्त भांडवलाच्या नेतृत्वाखाली होत असलेल्या जागतिकीकरणाचा मुकाबला करण्यासाठी अस्तित्वातील समाजवादी देश अर्थव्यवस्थेत सुधारणा करू पहात आहेत. उदारवाद जगातील सर्व देशांना भोवऱ्यात खेचून घेत असताना होत असलेल्या सुधारणा त्यांच्या अर्थव्यवस्था आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडण्यासाठी होत आहेत. या संक्रमणकालात समाजवादी देश या आव्हानाचा कसा मुकाबला करतात, याची अत्यंत गंभीरपणे तपासणी केली पाहिजे.

६.२ समाजवाद म्हणजे उत्पादन साधनांवर आणि अतिरिक्त मूल्यावर लोकांची मालकी असेल तर या सुधारणा म्हणजे समाजवादाला नकार आहे काय? या सर्व देशांत सुधारणा प्रक्रियेमध्ये वाढती आर्थिक विषमता, भ्रष्टाचार, वशिलेबाजी अशा नकारात्मक प्रवृत्ती दिसून येऊ लागल्या आहेत. तेथील सत्ताधारी कम्युनिस्ट पक्षांच्या हे केवळ ध्यानात आले आहे असे नाही तर त्या प्रवृत्ती दुरूस्त करण्याचे ठोस प्रयत्नही ते करताना दिसत आहेत. यातून निर्माण होतो एक महत्वाचा प्रश्न: सुधारणांच्या या प्रक्रियेमुळे शोषक भांडवली वर्ग निर्माण होऊन तो भविष्यातील प्रतिक्रांतीचे नेतृत्व करील काय? की या प्रक्रियेमुळे, आजच्या जागतिक वास्तवाच्या संदर्भात, समाजवादच जास्त बळकट होईल?

६.३ येथे एका गोष्टीची नोंद घ्यायला हवी. प्रत्येक समाजवादी क्रांती भांडवलशाहीपेक्षा श्रेष्ठ अशी समाजवादी व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने, ठोस परिस्थितीचे ठोस विश्लेषण करून, उत्पादक शक्तींचा वेगाने विकास कसा करायचा हे ठरवत असते. हे कसे करायचे हे प्रत्येक क्रांतीसमोर कोणती ठोस परिस्थिती आहे, त्या त्या देशात आणि आमतरराष्ट्रीय स्तरावर वर्गशक्तींचे संतुलन कसे आहे, यावर ठरत असते.

## चीन

६.४ लेनीनने नवीन आर्थिक धोरणाच्या (NEP) कालखंडात शासकीय भांडवलशाहीबाबत जी सैद्धांतिक भूमिका घेतली होती तशीच काहीशी परिस्थिती समाजवादी चीनने सुधारणा स्वीकारल्यानंतरच्या काळात दिसून येते. एका मागास अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर समाजवादी बांधणी करण्याला मदतकारक होईल इतकी उत्पादक शक्तींची वाढ कशी करायची, हा तेथील मुख्य प्रश्न आहे. लेनीनने त्याच्या काळात, प्राप्त राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीत, मागास उत्पादक शक्ती आणि विकसित समाजवादी उत्पादनसंबंध यांच्यामधील दरी भरून काढायचा सातत्याने प्रयत्न केला. (२४) पण एक गोष्ट ध्यानात घ्यायला हवी. सोव्हिएतच्या समाजवादी उभारणीतील हा एक विशिष्ट ऐतिहासिक अवस्थेतील टप्पा होता. (२५)

६.५ आज चीनमध्ये समाजवादातील उत्पादनसंबंधांना योग्य असा उत्पादक शक्तींचा स्तर उंचावण्याचा प्रयत्न केला जात आहे. उत्पादक शक्ती खालच्या स्तरावर असताना विकसित समाजवादी उत्पादनसंबंध फार काळ टिकाव धरू शकत नाहीत. उत्पादक शक्तींचा स्तर दीर्घकाळ खालचा राहिल्यास मागास उत्पादक शक्ती आणि समाजवादात दैनंदिन विस्तारीत होत असलेल्या भौतिक आणि सांस्कृतिक गरजा यांच्यात मोठा अंतर्विरोध निर्माण झाला असता. चीनमधील हा अंतर्विरोध सोडवला नाही तर चीनमधील समाजवादच धोक्यात येईल, असा निष्कर्ष चीनच्या कम्युनिस्ट पक्षाने काढला आहे.

६.६ चीनच्या कम्युनिस्ट पक्षाने आपल्या कार्यक्रमाचे स्वरूप स्पष्ट करताना म्हटले आहे: “चीन आज समाजवादाच्या प्राथमिक पायरीवर आहे, आणि तो दीर्घ काळ तेथेच असणार आहे. आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या मागास असलेल्या चीनचे समाजवादी आधुनिकीकरण करत असताना हा ऐतिहासिक टप्पा गाळणे शक्य नाही. हा टप्पा शंभरहून अधिक वर्षे टिकून राहील. समाजवादाची उभारणी करत असताना प्राप्त ठोस परिस्थितीतून जात चिनी वैशिष्ट्याच्या समाजवादाकडे मार्गक्रमण केले पाहिजे.”

६.७ चीनच्या कम्युनिस्ट पक्षाने **समाजवादाची प्राथमिक अवस्था** ही सैद्धांतिक संकल्पना मांडली. हे मुळात स्वत: मार्क्स आणि एंगल्स यांनी केलेल्या आणि नंतरच्या सर्व मार्क्सवाद्यांनी स्वीकारलेल्या मांडणीशी सुसंगतच आहे: समाजवाद ही भांडवलशाही आणि साम्यवादामधील संक्रमणावस्था असून ती साम्यवादी समाजाची पहिली अवस्था आहे. पण चीनचा कम्युनिस्ट पक्ष याच्याही पुढे एक पाऊल जाऊन असे मांडतो की, क्रांतीच्या प्रसंगी उत्पादक शक्तींचा स्तर काय होता यावर या संक्रमणाच्या अवस्थेत किती व कसे वेगवेगळे टप्पे असतील हे अवलंबून राहील. चीनच्या कम्युनिस्ट पक्षाच्या १३व्या परिषदेमध्ये हे पद्धतशीरपणे स्पष्ट करून दाखवले आहे. क्रांतीच्या वेळी चीन हा निम-सरंजामी, निम-वासाहतिक मागास देश असल्याने त्याला अर्थव्यवस्थेचे समाजवादी परिवर्तन फारच खालच्या स्तरावरून करावे लागले. या प्रक्रियेला तो पक्ष "चिनी वैशिष्ट्याच्या समाजवादाची उभारणी" म्हणतो.

६.८ हे परिवर्तन घडवून आणण्यासाठी चीनच्या कम्युनिस्ट पक्षाने आणखी एक सैद्धान्तिक संकल्पना मांडली: **समाजवादी बाजारपेठेवर आधारीत अर्थव्यवस्थेची**. जोपर्यंत क्रयवस्तूंचे उत्पादन होत राहील तोपर्यंत त्यांच्या विनिमयासाठी बाजारपेठेची गरज भासेल हे आता स्पष्ट झाले आहे.

६.९ चीनमध्ये प्रयत्न केला जात आहे समाजवादी शासनसंस्थेच्या नियंत्रणाखाली क्रयवस्तूंच्या बाजारपेठेची अर्थव्यवस्था निर्माण करण्याचा. उत्पादन साधनांची सामाजिक मालकी हाच या व्यवस्थेचा प्रमुख आधार राहील. चीनच्या कम्युनिस्ट पक्षाच्या मते याचा अर्थ "एक, संपूर्ण सामाजिक भांडवलात सार्वजनिक भांडवल प्रभुत्वस्थानी असेल; आणि दोन, राष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर शासकीय अर्थव्यवस्थेचे नियंत्रण असेल". याचा वापर करून ते खासगी बाजारपेठेच्या अर्थव्यवस्थेतून निर्माण होणारी वाढती विषमता आणि संपत्तीचे ध्रुवीकरण रोखून कष्टकरी जनतेला सुबत्तेची हमी देण्याचा प्रयत्न करत आहेत.

६.१० या सुधारणांचे निश्चितच सकारात्मक परिणाम दिसत आहेत. गेली तीस वर्षे चीनची अर्थव्यवस्था अभूतपूत्व अशा १० टक्के गतीने वाढत आहे, आणि पैशाच्या रूपात मोजल्यास दारिद्र्य १९८० ते २००५ या कालखंडात ८० टक्क्यांहून जास्त कमी झाले आहे. सुधारणा सुरू करत असताना सकल राष्ट्रीय उत्पन्न (GNP) १९८०च्या दुप्पट करून लोकांच्या मूलभूत गरजा भागवण्याचे चीनने योजले होते. त्याचबरोबर १९८० चे उत्पादन दुपटीहून अधिक वाढवून विसाव्या शतकाच्या शेवटी प्राथमिक सुबत्ता मिळवायचे उद्दिष्ट्य ठेवले होते. ही दोन्ही उद्दिष्ट्ये साध्य करण्यात आली आहेत. हे सारे करता आले याचे कारण "चीनने माओने घालून दिलेला रस्ता सोडला" हे नसून चीनच्या लोकसत्ताकाने पहिल्या तीन दशकांत जो केंद्रीय नियोजनाने पाया घालून दिला त्याच्या खंबीर पायामुळेच हे शक्य झाले. आता चीनच्या लोकसत्ताकाच्या शतक संवत्सरापर्यंत, म्हणजे २०४९पर्यंत, मध्यम विकसित देशांच्या दरडोई सकल राष्ट्रीय उत्पन्ना (GNP) ची पातळी गाठायचे, हे चीनचे तिसरे पाऊल आहे.

६.११ सुधारणांच्या ३३ वर्षांनंतर २०१० साली चीनचे एकूण आर्थिक उत्पन्न ५८८ अब्ज डॉलर्स, म्हणजे १९७८मधील उत्पन्नाच्या १६ पट झाले होते. २००५ मध्ये चीनचे दरडोई उत्पन्न जगातील सरासरी दरडोई उत्पन्नाच्या २४.९ टक्के होते, ते २०१० मध्ये ४६.८ टक्के झाले. देशाचा एकूण आयात-निर्यात व्यापार १९७८ मध्ये २०.६ अब्ज डॉलर्स होता, तो २०१० मध्ये २९७.४ अब्ज झाला. १९७९ ते २०१० पर्यंत वापरण्यात आलेली एकूण परकीय थेट गुंतवणूक१०४.८ अब्ज डॉलर्स होती.

६.१२ या तीन दशकांत चीनच्या सुधारणा प्रक्रियेतच कित्येक बदल घडून आले आहेत. ही प्रक्रिया १९७८ मध्ये सुरू झाली पण त्यानंतर सोव्हिएत युनियन आणि काही इतर समाजवादी शक्तींचे पतन झाल्याने नवी जागतिक परिस्थिती निर्माण झाली. त्याचबरोबर चीनच्या अंतर्गतही तिअनानमेन चौकासारख्या काही खळबळजनक घटना घडल्या. या घटनांमुळे सुधारणांच्या प्रक्रियेत काही दुरूस्त्या (course correction) कराव्या लागल्या. (२६)

६.१३ १९९०च्या दशकात विविध विभागांत खासगी क्षेत्राचा वेगाने प्रसार होऊन ग्रामीण भागातील आरोग्य, शिक्षण आणि सामजिक सेवा दुर्बल होत गेल्या.२००५ मध्ये औद्योगिक क्षेत्रातील वाढीव मूल्यातील ५० टक्के हिस्सा खासगी क्षेत्राचा होता आणि सार्वजनिक क्षेत्रातील रोजगाराहून दुप्पट रोजगार खासगी क्षेत्रात होता. असे असले तरी अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहाच्या समितीने केलेल्या अभ्यासानुसार शासनाच्या मालकीच्या उद्योगांची मालमत्ता २००३ मध्ये सकल घरेलू उत्पन्नाच्या ६० टक्के होती ती २०१०मध्ये ६२ टक्के जाली. २०१० मध्ये शेअर बाजारातील एकूण भांडवलापैकी ८० टक्के भांडवल शासनाचे प्रभुत्व असलेल्या उद्योगांचे होते. तसेच, खासगी कंपन्यांचा एकूण कर-महसुलातील वाटा १५ टक्क्यांहून कमी आहे. **फोर्च्यून ने** २०१० मध्ये जगातील सर्वात मोठ्या ५०० कंपन्यांच्या यादीत चीनमधील ४२ कंपन्यांचा समावेश केला आहे. त्यापैकी ३९ कंपन्या सरकारी मालकीच्या आहेत. स्वत: चीनने बनवलेल्या देशातील ५०० बड्या कंपन्यांच्या यादीत ७५ उद्योग येतात. त्यातील २९ कंपन्यात खासगी क्षेत्राचा काडीचाही वाटा नसून दहा कंपन्यात नाममात्र वाटा आहे. या ५०० कंपन्यांच्या एकूण मालमत्तेपैकी ८५ टक्के वाटा सार्वजनिक क्षेत्राचा आहे.सरकारी मालकीच्या कारखान्यांचे सरासरी आकारमान बिगरसरकारी कारखान्याहून कितीतरी मोठे आहे. त्यांची सरासरी संपत्ती बिगरसरकारी क्षेत्रातील संपत्तीच्या १३.४ पट आहे. सरकारी उद्योगांची सरासरी संपत्ती १९९९ मध्ये प्रत्येकी १३.४० कोटी RMB (चीनचे नाणे) होती, ती २००८ मध्ये प्रत्येकी सरासरी ९२.३० कोटी RMB म्हणजे ९ वर्षात ५८९ टक्क्यांनी वाढली होती. बिगर सरकारी उद्योगांच्या सरासरी संपत्तीत प्रत्येकी ६७ टक्के तिकीच वाढ झाली होती.

६.१४ अशा रीतीने औद्योगिक आणि सेवा क्षेत्रात खासगी उद्योगांची संख्या वाढत असली तरी महत्वाची क्षेत्रे ही सरकारच्या मालकीचीच आहेत याची नोंद घेणे आवश्यक आहे. शासनाच्या सर्वात मोठ्या अशा ५० कंपन्या एकत्र करण्यात आल्या असून खाण, तेल, पोलाद, टेलिकॉम, बँकिंग, ऊर्जा, रेल्वे, बंदरे आदी क्षेत्रात त्या उच्चस्थानी आहेत.

६.१५ सुधारणांच्या दुसऱ्या टप्प्यात ग्रामीण भागावर आणि ग्रामीण-शहरी असमतोलावर लक्ष केंद्रित करण्यात आले. २००६नंतरच शेतीवरील कर काढून टाकण्यात आला, धान्याच्या किंमतींवर अनुदान देण्यात येऊ लागले ग्रामीण आरोग्य आणि शिक्षणावरील खर्च वाढवण्यात आला. याचा अर्थ काही असमतोल दुरूस्त करण्यासाठी शासन नियोजन आणि हस्तक्षेप करत असते.

६.१६ तथापि, या प्रक्रियांमुळे वाढती विषमता, बेरोजगारी आणि भ्रष्टाचार यासारख्या काही समस्या आणि चिंताजनक घडामोडी उद्भवू लागल्या आहेत.

६.१७ **विषमता:** संपूर्ण देशाचा विचार करता २००२ मध्ये सर्वात वरच्या १० टक्के लोकांचे एकत्रित उत्पन्न सर्वात खालच्या १० टक्के लोकांच्या २२ पट होते. गेल्या १८ वर्षात ग्रामीणांच्या तुलनेत शहरी जनतेच्या उत्पन्नात १३पट वाढ झाली आहे. एक अमेरिका सोडली तर जगातील अब्जाधीशांची संख्या चीनमध्ये सर्वाधिक आहे. १९९७नंतरच्या दहा वर्षात चीनची विलक्षण आर्थिक प्रगती झाली. पण याच काळात सकल घरेलू उत्पन्नातील कामगारांच्या वेतनाचा वाटा ५३ टक्क्यांवरून ४० टक्क्यांवर आला.

६.१८ यापैकी विषमतेच्या काही समस्या दूर करण्यासाठी चीनच्या सरकारने ग्रामीण भागात दारिद्र्य निर्मूलनासाठी संघटीतपणे आणि नियोजनबद्ध रीतीने विकास योजना राबवायला सुरूवात केली. (२७) वाढता आर्थिक आणि सामाजिक विकास ध्यानात घेऊन सरकारने राष्ट्रीय दारिद्र्य रेषा ग्रामीण भागासाठी २००० मध्ये ८६५ युआन इतकी ठरवली होती, ती २०१० मध्ये १२७४ युआन इतकी करण्यात आली. या बदलामुळे ग्रामीण भागातील दारिद्र्यातील लोकसंख्या २०००मध्ये ९ कोटी ४२ लाख होती ती २०१०मध्ये २.६८ लाख झाली. त्यांचे एकूण ग्रामीण लोकसंख्येतील प्रमाण २०००मधील १०.२ टक्क्यांवरून २०१०मध्ये २.८ टक्के इतके खाली आले.

६.१९ **भ्रष्टाचार:** विविध सरकारी संस्थांनी २०१०मधील पहिल्या ११ महिन्यांत भ्रष्टाचाराची १,१९,००० प्रकरणे तपासली. हा आकडा आधीच्या वर्षाच्या १,१५,००० इतक्या प्रकरणांहून थोडा जास्त होता. या १,१९,००० पैकी १,०८,००० प्रकरणांचा तपास पूर्ण होऊन १,१३,००० जणांना शिस्तभंग केल्याप्रकरणी शिक्षा करण्यात आली. त्यापैकी ४,३३२ जणांना न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले.

६.२० **इतर समस्या:** चीनमध्ये इतरही काही समस्या आहेत. २००२ मध्ये भांडवलदारांना पक्षात प्रवेश देणारा बदल करण्यात आला, ही त्यापैकी एक समस्या. आज अनेक व्यावसायिक आणि उद्योजकांनी पक्षात प्रवेश केला आहे. पक्षाच्या रचनेत असा बदल झाल्याने पक्षाच्या वैचारिक आणि राजकीय घडणीवर काही दबाव पडू शकतो.

६.२१ चीनच्या कम्युनिस्ट पक्षाने आपल्या समजातून साम्राज्यशाही ही संकल्पनाच वगळून टाकली आहे. साम्राज्यशाही विरोधाची दिशाच गायब झाल्याने चिनी तरूणांमध्ये राष्ट्रवादी प्रवृत्ती डोकावू लागल्या आहेत.

६.२२ या साऱ्याचा निष्कर्ष असा की, गेल्या तीन दशकातील सुधारणांमुळे चीनने उत्पादक शक्तींचा मोठा विकास करून अर्थव्यवस्थेत लक्षणीय वाढ केली आहे. भांडवलशाहीच्या इतिहासात एखाद्या देशाच्या अर्थव्यवस्थेत सतत तीस वर्षे सरासरी १० टक्क्यांहून अधिक वाढ होत रहाणे ही अभूतपूर्व घटना होय. पण यामुळेच चीनमदील उत्पादनसंबंधांत आणि पर्यायाने सामाजिक संबंधात काही विपरित बदल झाले आहेत.

६.२३ हे अंतर्विरोध यशस्वीरित्या कसे सोडवले जातात यावर चीनचे भवितव्य अवलंबून आहे.

६.२४ त्याचबरोबर व्हिएतनाम, क्यूबा आणि उत्तर कोरिया यांनीही स्वीकारलेल्या सुधारणांचे मूल्यमापन करायला हवे. पूर्वी हे समाजवादी देश सोव्हिएत युनियनवर अवलंबून असत. आता

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत त्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सहभागी व्हावे लागत आहे. या देशांमधील समाजवादच्या अस्तित्वालाच साम्राज्यवादी जागतिकीकरणाने चूड लावू नये म्हणून सावध राहिले पाहिजे.

## व्हिएतनाम

६.२५ व्हिएतनामच्या कम्युनिस्ट पक्षाच्या ६व्या राष्ट्रीय परिषदेत जीवनाच्या सर्वांगाना व्यापणारे, विशेषत: आर्थिक क्षेत्रातील, दोई मोई (नूतनीकरण) नावाने बदल करायचा निर्णय घेण्यात आला.

६.२६ १९८६ मध्ये भरलेल्या व्हिएतनामच्या कम्युनिस्ट पक्षाच्या ६व्या परिषदेच्या अहवालात म्हटले आहे, "आर्थिक व्यवस्था बनवताना, विशेषत: उत्पादन आणि गुंतवणूकीची रचना करताना, आम्ही बहुतेक वेळा वेगाने विकास करण्याची मनीषा धरली; व्यवहारातील परिस्थिती आणि क्षमता यांचा विचार केला नाही . . .पुढे जाऊन त्यात संक्रमणकालात विविध प्रकारची मालमत्ता असण्याच्या गरजेचे विश्लेषण केले आहे. (२८) नंतर ७व्या परिषदेत नव्याने उद्भवलेल्या समस्यांचा विचार करून समाजवादाशी विसंगत असणाऱ्या काही प्रवृत्तींशी मुकाबला करण्याची गरज व्यक्त केली.

## क्यूबा

६.२७ क्यूबादेखील आपल्या आर्थिक धोरणाचा आढावा घेत काही नवी रचना करू पहात आहे. सोव्हिएत युनियन आणि समाजवादी गटाच्या पतनानंतर सोव्हिएत युनियनकडून मिळणारा पुरवठा थांबल्यामुळे क्यूबा अचानक निराधार, एकटा पडला. अमेरिकेन साम्राज्यशाहीने क्यूबाची आधुनिक जगाच्या इतिहासातील अभूतपूर्व आणि अत्यंत पाशवी अशी आर्थिक नाकेबंदी चालूच ठेवली आहे. या पार्श्वभूमीवर क्यूबाच्या पक्षाने "समाजवादाचे जतन करण्यासाठी, देशाचा आर्थिक विकास करण्यासाठी आणि लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी" क्यूबाच्या आर्थिक रचनेत सुधारणा करण्यासाठी जानेवारी २०११ मध्ये **पक्षाच्या आणि क्रांतीच्या आर्थिक आणि सामाजिक धोरणाविषयी मार्गदर्शक सूत्रे** हा ठराव स्वीकारला.

६.२८ वेतन, पेन्शन, तोट्यातील सरकारी मालकीचे उद्योग बंद करणे, 'अनावश्यक मोफत सुविधा, विनाकारण देण्यात आलेली ज्यादा अनुदाने आणि शिधापत्रिका' कमी करण्यासंबंधी क्यूबा नव्याने विचार करत आहे. जमीन मुक्त करून ती छोट्या जमीन मालकांना कसायला देणे, छोट्या उत्पादकांसाठी बाजारपेठ निर्माण करणे आणि निर्यातीसाठी उत्पादन करायला प्रोत्साहन देणे यासाठी त्याने काही नियोजन केले होते. त्याचसोबत श्रमाची उत्पादकता वाढवणे, त्याला शिस्त लावणे आणि जादा झालेले कामगार इतरत्र हलवणे याविषयीही काही पावले उचलण्यात आली होती. तसेच, जादा उत्पन्न असणाऱ्यांवर जादा कर लावण्यासाठी करपद्धतीत बदल, उत्पादनवाढीला प्रोत्साहन देण्यासाठी कर सवलत आणि देशात प्रचलीत असलेली दुहेरी चलनाची पद्धत संपुष्टात आणणे ही पावलेदेखील उचलली जात आहेत. (२९)

## उत्तर कोरिया

६.२९ उत्तर कोरियाने २०११ मध्ये **आर्थिक विकासासाठी दशवार्षिक व्यूहात्मक योजना** स्वीकारून आर्थिक प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी स्टेट जनरल ब्यूरोची स्थापना केली. (३०)

६.३० अशा सुधारणा करून उत्तर कोरिया सामाजिक उत्पादक शक्तीत वाढ करण्याचा प्रयत्न करत आहे, कारण त्याशिवाय आर्थिक आणि सामाजिक विकास शक्य नाही. समाजवादाचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्यासाठी हे आवश्यकच आहे.

६.३१ चीनच्या सुधारणा प्रक्रियेबाबत आपण जे निरीक्षण नोंदवले ते या बाबतीतही खरे आहे:

सुधारणांच्या या अनुभवातून निर्माण होणाऱ्या समस्या आणि अंतर्विरोध कसे हाताळले जातात, हे महत्वाचे आहे. यातूनच समाजवादाची भविष्यातील दिशा निश्चित होणार आहे.

## ७
## काही विकसनशील देश

### लॅटिन अमेरिका

७.१ लॅटिन अमेरिकेत साम्राज्यशाही आणि तिच्या नव-उदार आक्रमक धोरणाविरुद्ध जनतेने प्रचंड उठाव केला. त्यावर स्वार होऊन लोकांच्या बाजूची सरकारे सत्तेवर आली. त्याला "गुलाबी लाट – डावे वळण" असे संबोधले जाऊ लागले.

७.२ लोकशाही मार्गाने निवडणुका जिंकून अनेक लॅटिन अमेरिकन देशांत डावीकडे झुकणारी अथवा पुरोगामी सरकारे आली आहेत. कम्युनिस्ट पक्षांचा सहभाग असलेली डावीकडे झुकणारी सरकारे साम्राज्यवादी जागतिकीकरण आणि भांडवली नव-उदारवादाला पर्याय देत आहेत. हा अनुभव पेरू आणि कोलंबियात सशस्त्र लढे करणारा डावा साहसवाद किती निष्फळ आहे हेच दाखवून देतो. अमेरिकेने कोलंबियात सात लष्करी तळ उभे केले आहेत. तेथील उजव्या सरकारच्या मदतीने त्या तळांचा वापर मुख्यत: व्हेनेझुएलाला लक्ष्य करण्याचा आहे. या आक्रमकतेला गोंडस नाव दिले जाते "डाव्या अतिरेकापासून लोकशाहीचा बचाव करायचे".

७.३ गेल्या काही वर्षात या पुरोगामी सरकारांनी अमेरिकेवरील आपल्या देशांचे अवलंबित्व लक्षणीय रित्या कमी केले असून दक्षिणेतील देशांदरम्यानच्या व्यापारात वाढ केली आहे. याचा एक परिणाम म्हणजे या देशांचा आर्थिक अरिष्टापासून बऱ्यापैकी बचाव झाला. व्हेनेझुएला, इक्वाडोर आणि बोलिव्हिया हे तीन देश साम्राज्यसाहीच्या विरोधात जास्त खंबीरपणे उभे आहेत आणि त्यांनी आधीच्या सत्ताधाऱ्यांनी खासगी क्षेत्राला बहाल केलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील बऱ्याच उद्योगांचे राष्ट्रीयीकरण केले आहे. व्हेनेझुएलाने कित्येक बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. आणि आधी बोलिव्हियाने केले तसे इक्वाडोरने अलिकडे त्यांच्या ऊर्जा स्रोतांचे राष्ट्रीयीकरण केले आहे. सामाजिक गुंतवणुकीवर वाढता भर देऊन आणि सामाजिक-आर्थिक विषमता कमी करण्यासाठी शासनाला महत्वाची भूमिका देऊन हे देश त्या खंडातील इतर साम्राज्यशाहीविरोधी देशांना पर्यायी मार्ग दाखवत आहेत.

७.४ या खंडातील देशांत परस्पर व्यापार वाढावा यासाठी MERCOSUR, ALBA, Sao Paulo Forum सारखी व्यासपीठे त्यांनी निर्माण केली आहेत. त्यात लॅटिन अमेरिका आणि कॅरिबियन (वेस्ट इंडीज) देशांनी अलिकडे CELAC नावाचा आर्थिक सहकार्यासाठी गट निर्माण केला आहे. या सर्व व्यासपीठांचा उपयोग केवळ त्या देशांमध्ये घट्ट संबंध निर्माण करण्यासाठीच केला जात नाही तर नव-उदारवादी दबावाला संघटित विरोध करण्यासाठीही केला जात आहे. एके काळी अमेरिका हा खंड म्हणजे आपली जहागीर असल्याच्या थाटात वावरत असे. आता त्यावरील सुटलेली पकड पुन्हा मिळवण्याचा प्रयत्न ती करत आहे. या प्रदेशात आपले लष्करी अस्तित्व ती सतत वाढवत आहे. होंडुरासमध्ये केला तसा हस्तक्षेप या देशांत करू पहात आहे. इतर काही देशांतील उजव्या सरकारांचाही ती या विभागात ढवळाढवळ करण्यासाठी वापर करत आहे. अमेरिकेचे हे अश्लाघ्य प्रयत्न हाणून पाडण्यासाठी आणि साम्राज्यशाहीच्या विरोधात जनमत संघटित करण्यासाठी येथील पुरोगामी सरकारे आणि डाव्या शक्ती पाय घट्ट रोवून उभ्या आहेत.

७.५ १९९८ नंतरच्या वीस वर्षांत व्हेनेझुएलाच्या सामाजिक निर्देशांकात लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते. दारिद्र्य आणि उत्पन्नातील विषमता यांच्यात भरीव घट झाली आहे. अरोग्य आणि शिक्षण, पाणी आणि सार्वजनिक स्वच्छता यांचा लाभ मिळण्याचे निर्देशांकही लक्षणीय प्रमाणात वाढले आहेत. १९९९-२००० च्या तुलनेत २००७-२००८ मध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दुप्पट

झाली आहे. (३१)

७.६ साम्राज्यशाही अमेरिकन देशांमधील मुक्त व्यापार कराराचा **(FTAA)** वापर करून हा विभाग आपल्या कह्यात ठेवू पहात आहे. हा कट हाणून पाडण्यासाठी ALBA या लोकप्रिय नावाने ओळखला जाणारा "लॅटीन अमेरिकेसाठी बोलिव्हारियन पर्याय" हा राजकीय प्रकल्प उभा राहिला आहे. FTAA ला पर्याय द्यायच्या निमित्ताने ALBA निर्माण झाला असला तरी तो लॅटीन अमेरिकन आणि कॅरिबियन जनता गेली कित्येक युगे साम्राज्यशाहीशी करत असलेल्या संघर्षाला दिलेला प्रतिसाद आहे. खरे तर मनरोवाद (Monroism) आणि बोलिव्हारवाद (Bolivarianism) असे दोन परस्पर पर्याय आहेत. “अमेरिका खंडासाठी अमेरिकन देश" अशी भाषा करणाऱ्या मनरोवादाच्या पोटातील हेतू "अमेरिकेसाठी (USA) अमेरिकन देश" असा आहे. हा अमेरिकन खंडाची लूट करून तो उध्वस्त करायचा हा प्रकल्प आहे. या उलट बोलिव्हारवाद हा लॅटिन अमेरिकन आणि कॅरिबियन जनतेच्या एकजुटीचा संकल्प आहे. या संकल्पाचा स्फूर्तिदाता आहे, सायमन बोलिव्हार. त्याला "लोकसत्ताकांचे संघराज्य" निर्माण करायचे होते. थोडक्यात, एका बाजूला "साम्राज्यवादी प्रकल्प" आणि त्याला पर्याय असलेला "मुक्ती प्रकल्प" असा हा संघर्ष आहे. त्या संघर्षाचे आजचे रूप FTAA आणि ALBA या व्यासपीठांद्वारा व्यक्त होते. (३२)

७.७ साम्राज्यशाहीच्या राजकीय आणि आर्थिक गरजा भागवण्यासाठी ती आपला प्रभाव वाढवू पहात आहे. त्याचा पराभव करण्यासाठी लॅटीन अमेरिकन जनतेला अर्थनीतीवर नियंत्रण ठेवणारे, तिला दिशा देणारे राजकारण करावे लागेल, अर्थनीतीचे सारथ्य राजकारणाला करावे लागेल. ही सरकारे हे सारथ्य किती खंबीरपणे करतात, यावर त्यांना साम्राज्यशाहीवर मात करण्यात यश येईल की नाही हे ठरेल. (३३)

७.८ साम्राज्यवादी जागतिकीकरणाविरुद्ध जगभर चाललेल्या लढ्याचा लॅटिन अमेरिकेतील लोकशक्ती हा एक महत्वाचा घटक आहे. त्यासोबतच, युद्ध आणि लष्करी आक्रमणांच्या विरोधात जगभरच्या लढ्यात या लोकशक्तीला महत्वाची भूमिका आहे. यातून साम्राज्यशाहीविरोधात उभ्या रहाणाऱ्या जागतिक फळीत भविष्यातील क्रांतीकारक परिवर्तनाची क्षमता असेल.

दक्षिण आफ्रिका

७.९ दक्षिण आफ्रिकेतील जनतेने वर्णद्वेषी राजवटीवर ऐतिहासिक आणि वीरश्रीयुक्त विजय मिळवला. दक्षिण आफ्रिकन कम्युनिस्ट पक्षाने (SACP) या परिवर्तनाचे वर्णन राष्ट्रीय लोकशाही क्रांती असे केले आहे. या परिवर्तनानंतर आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेस (ANC), दक्षिण आफ्रिकन कम्युनिस्ट पक्ष (SACP) आणि दक्षिण आफ्रिकेचा ट्रेड युनियन महासंघ (COSATU) यांच्या त्रिपक्षीय आघाडीने अत्यंत अन्यायी, शोषक आणि वंशवादी व्यवस्था बदलून बव्हंशाने कृष्णवर्णीय असलेल्या जनतेला आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवायचे काम अत्यंत गांभीर्याने अंगिकारले. यासाठी सुरवातीला १९९६ साली त्यांनी आर्थिक वाढ, रोजगार आणि पुनर्वाटप (GEAR) या नावाने ओळखला जाणारा कार्यक्रम स्वीकारला. पण कालांतराने या धोरणामुळे नव-उदार अर्थनीतीच बळकट होत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. १९९४ मध्ये सकल घरेलू उत्पन्नामध्ये (GDP) कामगारांचा हिस्सा ५१ टक्के होता, तो २००८ मध्ये ४२ टक्क्यापर्यंत खाली आला. याच काळात नफा मात्र GDP च्या २५ टक्क्यांवरून ३३ टक्क्यांवर गेला. आता द. आफ्रिकेला या परिस्थितीत बदल करण्यासाठी काही गंभीर पावले उचलावी लागत आहेत.

७.१० देशांतर्गत स्थिती आणि जागतिक वास्तव यांच्या अनुभवावर द. आफ्रिकन कम्युनिस्ट पक्षाने केवळ कामगारवर्गाचे प्रभुत्व प्रस्थापित केले तरच यश मिळू शकेल असा निष्कर्ष काढला आहे: “ कामगार वर्गाचे प्रभुत्व स्थापन करायचा संघर्ष हा भिन्नवर्गीय असलेल्या राष्ट्रीय लोकशाही लढ्याला पर्याय नव्हे - उलट, त्याने यशस्वीरित्या आगेकूच करावी, त्याची मुळे घट्ट रुजावीत आणि त्याचे संरक्षण व्हावे यासाठी ती आवश्यक असलेली पूर्वअट आहे.”

# ८
# भारतीय परिस्थितील समाजवाद

८.१ आपल्या पक्षाच्या कार्यक्रमात भारतीय क्रांतीच्या व्यूहरचनेची संकल्पना मांडण्यात आली आहे. त्यानुसार क्रांतीचा लोकशाही टप्पा पूर्ण करणे ही आपली जबाबदारी आहे. भारताचे समाजवादी परिवर्तन करण्यासाठी जनतेची लोकशाही क्रांती ही पूर्वअट आहे.

८.२ कामगारवर्गाच्या नेतृत्वाखालील जनतेची लोकशाही आघाडी जनतेच्या लोकशाही क्रांतीचे कसे नेतृत्व करील, तसेच जनतेच्या लोकशाही क्रांतीचा कार्यक्रम काय आहे, याची सविस्तर मांडणी पक्षाने अद्यावत केलेल्या आपल्या कार्यक्रमात केली आहे. या क्रांतीसाठी "आत्मनिष्ठ घटक" बळकट करणे हा एक अत्यंत कळीचा मुद्दा आहे. तो आपण संघर्षांच्या संसदीय आणि बिगरसंसदीय मार्गांचा कसा उपयोग करतो; आणि आपण कामगार-शेतकरी एकजूट कशी बांधतो, यावर अवलंबून आहे. जनतेची लोकशाही क्रांती सिद्ध करण्यासाठी भारतीय जनतेतील वर्गशक्तींचे संतुलन बदलणारी योग्य अशी व्यूहरचना केली पाहिजे. आणि ही व्यूहरचना प्रत्यक्षात आणण्यासाठी वेळोवेळी आवश्यक डावपेच आखले जात असतात.

८.३ जनतेची लोकशाही प्रस्थापित झाल्यावरच आणि साम्राज्यशाही, सरंजामशाही आणि मक्तेदार भांडवल यांच्या विरोधातली कार्ये पूर्ण झाल्यावरच भारतीय जनतेला समाजवादाकडे आगेकूच करता येईल. **भारतीय परिस्थितीतील समाजवाद म्हणजे काय?** जनतेची लोकशाही क्रांती यशस्वीरित्या पूर्ण होत नाही तोपर्यंत भारतीय समाजवादाची blue print देता येणे शक्य नाही. सध्या आपण केवळ आपल्या आजपर्यंतच्या वैचारिक दस्तावेजातील समजाच्या आधारे काही रूपरेखाच देऊ शकतो:

- आपला समाजवाद म्हणजे सर्व जनतेला अन्न सुरक्षा; संपूर्ण रोजगार; सर्वांना शिक्षण, आरोग्य आणि निवासाची उपलब्धता. कामगार, शेतकरी आणि आजपर्यंत परिघाबाहेर राहिलेल्या समाजविभागांचे आर्थिक आणि राजकीय सक्षमीकरण.
- सर्वात महत्वाचे म्हणजे लोकांची सत्ता हीच सार्वभौम असेल. समाजवादी न्याय, राजकीय आणि सामाजिक व्यवस्थांचे लोकशाही, लोकशाही हक्क आणि नागरी स्वातंत्र्य हे अविभाज्य घटक असतील. भांडवली लोकशाहीत औपचारिक हक्क असले तरी लोकांना ते राबवण्याची क्षमता नाकारण्यात येते. समाजवादात लोकशाही सर्व लोकांच्या आर्थिक सक्षमीकरणावर आधारलेली असेल; गुणवत्तापूर्ण मानवी जीवन सघन करत रहाणे ही त्याची मूलभूत गरज असेल आणि त्यावरच समाजवादी लोकशाही भरभराटीला येईल. सर्वहारांच्या शासनसंस्थेखाली समाजवाद मजबूत करण्यासाठी मतभेदाचे, अभिव्यक्तीचे आणि मतवैविध्याचे स्वातंत्र्य विकसित होत राहील.
- समाजवादात जातीव्यवस्था नष्ट करून जातीय अत्याचाराचा अंत केला जाईल; सर्व भाषिक गटांना समानता देऊन सर्व भाषांचा समान विकास केला जाईल. सर्व अल्पसंख्याक आणि परिघाबाहेरील समाजविभागांना खरी समानता मिळून लैंगिक अत्याचाराचा अंत केला जाईल.
- समाजवाद म्हणजे उत्पादन साधने सामाजिक करून केंद्रिय नियोजनाच्या सहाय्याने केलेली समाजवादी आर्थिक उभारणी. जोपर्यंत क्रयवस्तूंचे उत्पादन असेल तोपर्यंत बाजारपेठ अस्तित्वात रहाणारच. तथापि, केंद्रिय नियोजनाच्या मार्गदर्शनाने बाजाराच्या शक्ती नियंत्रित केल्या जातील. मालमत्तेचे विविध प्रकार अस्तित्वात असले तरी उत्पादन साधनांची सामाजिक मालकी निर्णायक असेल. सामाजिक मालकीचा अर्थ सरकारी मालकीचे सार्वजनिक क्षेत्र असाच केवळ असणार नाही. त्याला महत्वाचे स्थान असले तरी त्यासोबत समुदाय (collective), सहकार आणि आर्थिक जीवन नियंत्रणात ठेवण्यासाठी आर्थिक धोरणावर शासनाचे नियंत्रण, यांनाही स्थान असेल.

८.४ आजच्या जागतिक वास्तवाने उभी केलेली आव्हाने पेलण्यासाठी जगभरच्या क्रांतीकारी शक्ती जे मार्ग अवलंबत आहेत, त्यापासून योग्य धडे घेऊन भारतातील क्रांतीकारी लढा बळकट करत असताना

आपण भांडवली जागतिकीकरणाने लादलेले आव्हान भारताच्या संदर्भात पेलायला हवे. या जागतिकीकरणाने सामाजिक-आर्थिक-सांस्कृतिक या सर्वच क्षेत्रात विस्तृत बदल घडवून आणले आहेत. देशात आर्थिक सुधारणा राबवल्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि लोकजीवनावर सखोल आणि गंभीर परिणाम झाले आहेत. ही आव्हाने पेलायलाही आपण सिद्ध झाले पाहिजे. यासाठी आपले दीर्घ पल्ल्याचे व्यूहात्मक उद्दिष्ट साधण्यासाठी, भारतीय जनतेच्या मुक्तीसाठी वेळोवेळी पक्ष परिषदांतून योग्य डावपेच आखण्याची आपल्यावर जबाबदारी आहे.

## ९
## सध्याची मार्क्सवादविरोधी प्रतिगामी वैचारिक आव्हाने

९.१ सम्राज्यशाहीच्या बाजूने झुकलेले वर्गशक्तींचे संतुलन पहाता मार्क्सवाद आणि साम्यवाद यांच्यावर केवळ वैचारिकच नव्हे तर सर्वांगाने हल्ले होणे अपेक्षितच होते.

९.२ गेल्या वीसेक वर्षांत या प्रवृत्ती जास्तच आक्रमक झालेल्या आहेत. सोव्हिएत युनियनच्या पतनानंतर आता मार्क्सवादाच्या पलिकडे जायला हवे, असा विचार मांडला जात आहे. त्यामुळे मार्क्सवादाचा “पुनर्विचार”, “पुनर्मूल्यमापन” अथवा “पुनर्रचना” अशा संकल्पना फॅशनेबल बौद्धिक वर्तुळात वापरल्या जाऊन सामान्य जनतेवर प्रभाव पाडत त्यांना गोंधळात टाकत आहेत.

९.३ **आधुनिकोत्तरवाद:** वित्त भांडवलाच्या रेट्याने चाललेल्या साम्राज्यवादी जागतिकीकरणाने कित्येक मार्क्सवादविरोधी विचारांना आणि सिद्धांतांना जन्म दिला आहे. हे विचार आणि सिद्धांत सर्व पुरोगामी, वैश्विक विचारसरणींना नकार देतात. भांडवली विचारसरणीच्या दारुगोळ्यात वर्गसमन्वय, वर्गसंघर्षाची अप्रस्तुतता, कामगारवर्गाच्या क्रांतीकारी भूमिकेला नकार आदि संकल्पनांची रेलचेल असते. त्यात आता भर पडली आहे, मार्क्सवादविरोधी आधुनिकोत्तरवादी सिद्धांताची.

९.४ विसाव्या शतकातील अखेरच्या चरणात भांडवलशाहीला मिळालेले यश आणि समाजवादाची पीछेहाट यातून निर्माण झालेला भांडवली दृष्टिकोन म्हणजे आधुनिकोत्तरवाद. ही विचारसरणी प्रबोधनकालाच्या सर्व मूल्यांसमोर प्रश्न उभे करत मार्क्सवादासकट सर्व वैश्विक तत्त्वज्ञाने आणि राजकारण "एकाधिकारवादी" असल्याचे सांगून झिडकारून टाकते. भांडवलाशाही वा समाजवाद या व्यवस्था आहेत असे आधुनिकोत्तरवाद मानत नाही. अशा रीतीने वर्ग आणि वर्गसंघर्ष या संकल्पना नाकारणारे हे तत्त्वज्ञान जागतिक वित्तीय भांडवलशाहीला उपकारकच आहे.

९.५ **सामाजिक लोकशाही:** सामाजिक लोकशाही ही सुधारणावादी विचारसरणी मूलतः कामगार चळवळीतून उदयाला आली. भांडवलशाहीशी मिळतेजुळते घेत भांडवली व्यवस्थेच्या पोटात राहून तिच्यात सुधारणा करण्याचा पुरस्कार ती करत असे. पण आता जागतिक स्वरूप आलेल्या वित्त भांडवलाच्या युगात सामाजिक लोकशाही पार बदलून गेली आहे. सुधारणांची जागा नव-उदार धोरणांच्या समर्थनाने घेतली आहे. “तिसरा मार्ग" हे दुसरे तिसरे काही नसून या समर्थनावर घातलेले पांघरूण आहे. आपण मार्क्सवादी या नात्याने सामाजिक लोकशाहीच्या या सिद्धांताचा प्रतिकार करून तिचे भांडवलाच्या सत्तेचे शेपूट हे खरे रूप उघड करत राहिले पाहिजे.

९.६ पण कालौघात आपला कार्यक्रम प्रत्यक्षात आल्यानंतर, वर्गविहीन साम्यवादी व्यवस्था प्रस्थापित झाल्यानंतर स्वत:ची आवश्यकता संपते असे जाहीर करणारी ती एकमेव विचारसरणी आहे. मार्क्सवादी विचारसरणीला भांडवलशाहीच्या पोटात राहून त्या व्यवस्थेची जी सखोल जाण येते त्यातूनच ती या व्यवस्थेपलिकडील ऐतिहासिक शक्यता पाहू शकते. त्यामुळे जोपर्यंत भांडवलशाही अवस्था पार होत नाही तोपर्यंत मार्क्सवाद कालबाह्य होत नाही. भांडवलोत्तर जगात मार्क्सवादी तत्त्वज्ञान आणि जीवनदृष्टी समाजवादी बांधणी आणि साम्यवादाकडे संक्रमण करण्याचे शास्त्रीय मार्गदर्शन करत राहील.

९.७ यापूर्वीच्या आपल्या सर्व दस्तावेजात म्हटल्यानुसार मार्क्सवाद ही पोथी नसून ते "सृजनशील विज्ञान" आहे. “ठोस परिस्थितीचे ठोस विश्लेषण" या संकल्पनेवर ते आधारलेले आहे. सर्वसाधारण इतिहासाचे आणि विशेषकरून भांडवलसाहीचे विश्लेषण करणारे ते विज्ञान आहे. मार्क्सने घालून दिलेल्या या पायावरच आपण आजच्या "क्षणाचा" (conjuncture) आपला समज सघन करत भविष्यातील शक्यतांचा वेध घेऊ शकतो. मार्क्सवाद ही एक बंदिस्त वैचारिक व्यवस्था नसून सततची संपन्न होत जाणारी सैद्धांतिक प्रक्रिया आहे.

९.८ सध्याच्या आणि भविष्यात निर्माण होणाऱ्या मार्क्सवादविरोधी विचारसरणींशी सैद्धांतिक पातळीवर आणि त्यांतून निर्माण होणारा वर्गीय एकजुटीचा घात करणाऱ्या प्रवृत्तींशी व्यावहारिक पातळीवर मुकाबला करत राहिलेच पाहिजे.

## १०
## भारतातील परिस्थिती: काही ठोस विषय

१०.१ वर्गशक्तींचे संतुलन साम्राज्यशाहीचे बाजूने झुकण्याच्या या संक्रमणकाळात आपले क्रांतीकारी उद्दिष्ट साध्य करण्यासाठी वर्गशक्तींचे संतुलन बदलण्यासाठी आपल्याला सर्व ताकद एकवटून प्रयत्न करावे लागतील. त्यासाठी आजच्या ठोस परिस्थितीत वर्गसंघर्ष तीव्र करण्यासाठी जोरदार लोकसंघर्ष करावे लागतील.

१०.२ **संसदीय आणि बिगरसंसदीय मार्ग:** वरील उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने आपल्या सुधारीत कार्यक्रमात म्हटले आहे: “भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) शांततेच्या मार्गाने जनतेची लोकशाही प्रस्थापित करून समाजवादी परिवर्तन घडवून आणायचा प्रयत्न करतो. जनतेची जोमदार चळवळ उभारून, संघर्षाच्या संसदीय आणि बिगरसंसदीय मार्गांचा वापर करून, कामगारवर्ग आणि त्याचे साथीदार प्रतिगामी शक्तींचा विरोध मोडून काढत शांततेच्या मार्गाने परिवर्तन करायसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करील. पण सत्ताधारी वर्ग कधीच स्वेच्छेने सत्तेचा त्याग करत नाहीत, हे सतत ध्यानात ठेवायला हवे. बेकायदेशीर आणि हिंसक मार्गांचा अवलंब करून लोकांची इच्छा झिडकारून द्यायचा ते प्रयत्न करत असतात. त्यामुळे देशाचे राजकारण जी जी आकस्मिक वळणे घेईल, जे जे प्रसंग ओढवतील त्यांचा मुकाबला करण्यासाठी क्रांतीकारी शक्तींनी सतत जागरूक रहायला हवे.”

१०.३ अशा रीतीने लढ्याच्या संसदीय आणि बिगरसंसदीय मार्गांची व्यवहारात योग्य सांगड घालणे, हे पक्षासमोरील सद्यस्थितीतील महत्वाचे कार्य आहे. आपल्या पक्ष कार्यक्रमात म्हटले आहे, “ भारतातील संसदीय राज्यप्रणाली ही भांडवलदारांची वर्गीय सत्ता असली तरी ती लोकांच्या प्रगतीची निदर्शकदेखील आहे. लोकांना आपल्या हितसंबंधांचे रक्षण करायची, काही प्रमाणात शासनसंस्थेच्या कारभारात त्यांना हस्तक्षेप करायची आणि आपला लोकशाही व सामाजिक प्रगतीसाठी चाललेला लढा पुढे नेण्याची काही संधी ती उपलब्ध करून देते.” (परिच्छेद ५.२२) तथापि, बड्या भांडवलाची वाढती ताकद, राजकारणातील प्रचंड प्रमाणात पैश्याचा प्रवेश आणि राजकारणाचे गुन्हेगारीकरण यामुळे लोकशाही प्रक्रियेला इजा होऊन ती विकृत होऊ लागली आहे.

१०.४ विजयवाडा येथे झालेल्या पक्षाच्या केंद्रिय समितीच्या विस्तारीत बैठकीत स्वीकारण्यात आलेल्या **राजकीय ठरावात** म्हटले आहे, “ नव-उदारवाद आणि जागतिक वित्त भांडवलाच्या प्रभावामुळे संसदीय लोकशाहीलाच कीड लागत आहे. राजकारणातील पैश्याच्या आणि गुन्हेगारीच्या वापरामुळे लोकशाहीचे अवमूल्यन होत असताना लोकशाही हक्कांवर वाढते नियंत्रण येत आहे. प्रशासकीय उपाय आणि न्यायालयीन हस्तक्षेपाद्वारे निदर्शने, सार्वजनिक सभा आणि सार्वत्रिक संप करायच्या अधिकारावर बंधने घातली जात आहेत. लोकांच्या या हक्कांवरील बंधनांचे समर्थन करण्यासाठी आणि तसा प्रचार करण्यासाठी कार्पोरेट प्रसारमाध्यमांचा वापर केला जात आहे.” (परिच्छेद २.३५)

१०.५ नागरिकांचे लोकशाही हक्क आणि लोकशाही व्यवस्था बळकट करत तिचा विस्तार करायचा संघर्ष हा जनतेच्या लोकशाहीतील लोकशाही रचनेकडे जाणाऱ्या भांडवली-जमीनदारी शासनाविरुद्ध कष्टकरी जनतेने चालवलेल्या लढ्याचाच एक भाग आहे. आपला पक्ष कार्यक्रम म्हणतो, "लोकहितासाठी संसदीय आणि लोकशाहीच्या संस्थांचे संरक्षण करणे आणि त्यांचा बिगरसंसदीय कार्यासोबत कौशल्याने वापर करणे अत्यंत महत्वाचे आहे." (परिच्छेद ५.२३)

१०.६ या दृष्टिकोनातून जनतेच्या चळवळी बळकट करण्यासाठी संसदीय व्यासपीठांचा वापर केला पाहिजे. सध्याच्या भांडवलदार-जमीनदार व्यवस्थेला पर्याय निर्माण करण्यासाठी एक बलवान चळवळ बांधावी लागेल, आणि या चळवळीच्या विकासासाठी संसदीय आणि बिगरसंसदीय कार्ये एकत्रितपणे करावी लागतील.

१०.७ परंतु, या क्रमात निर्माण होऊ शकणाऱ्या अपप्रवृत्तींपासून सावध रहायलाच पाहिजे. संसदीय लोकशाही लोकांच्या मनात काही भ्रम पैदा करते. त्यामुळे जनतेच्या चळवळी आणि वर्गीय संघर्ष कमकुवत होतात. या भ्रमांचा मुकाबला करताना आणि लोकांनी आपली वर्गीय सत्ता बिनबोभाट पत्करावी म्हणून असे भ्रम पैदा करणाऱ्या सत्ताधारी वर्गांची कारस्थाने उघड करताना शोषित जनतेने क्रांतीकारी उठाव करावा यासाठी आपण योग्य डावपेच आखले पाहिजेत.

१०.८ एवढेच नव्हे, शांततामय मार्गाने संक्रमण होईल असा भ्रमही बळकट होण्याची शक्यता असते. हा प्रश्न आपण अद्ययावत केलेल्या पक्ष-कार्यक्रमात निर्णायकरित्या सोडवला आहे. संसदीय संधीसाधूपणाच्या विरुद्ध सतत संघर्ष केला पाहिजे, हे आपण वारंवार करत असलेल्या पक्षसुधार मोहिमांतून मांडत आलो आहोत. संसदीयवाद आणि संसदीय भ्रम याविरुद्ध सतर्क राहून संसदीय आणि बिगरसंसदीय लढ्यांना कुशलतेने एकत्र गुंफायला हवे.

१०.९ आजच्या परिस्थितीत, माओवादाने डाव्या साहसवादी विकृतीचे वैचारिक आव्हान भारतीय जनतेच्या क्रांतीकारी वर्गलढ्यापुढे उभे केले आहे. त्यांचा समज चुकीचा आहे हे वारंवार सिद्ध झालेले असले तरी माओवादी भारतीय सत्ताधारी वर्गाचे वर्णन दलाल/नोकरशाही असेच करत शासनसंस्थेविरुद्ध ताबडतोबीच्या सशस्त्र लढ्याच्या मांडणीला चिकटून आहेत. त्याने खास करून माकपला आपल्या हल्ल्याचे लक्ष्य केले आहे. प्रतिगामी भांडवली राजकीय पक्षांशी शक्तींशी हातमिळवणी करून माकपचे कार्यकर्ते आणि सहानुभूतिदार यांच्यावर ते खुनी हल्ले करत आहेत. अशा डाव्या साहसवादी प्रवृत्तीविरुद्ध वैचारिक संघर्ष छेडत त्याच्याशी राजकीय आणि संघटनात्मक मुकाबला केला पाहिजे. शास्त्रीय आणि क्रांतीकारी पायावर समाजवाद उभा करण्यासाठी जनतेची चळवळ विकसित करण्यासाठी हा लढा आवश्यक आहे.

१०.१० आपल्यासमोर संसदीयवाद आणि डावा साहसवाद असे दोन वैचारिक सापळे आहेत. आपण संसदीय कार्यावर पूर्णत: अवलंबून राहिलो तर जनतेला संघटीत करून वर्ग संघर्ष करण्याकडे दुर्लक्ष होईल. अशा रीतीने आपण संसदीय सुधारणावादाच्या सापळ्यात अडकून पडू. पण दुसरीकडे डाव्या साहसवादाला - या बालरोगाला - बळी पडून संसदीय लोकशाहीलाच नकार द्यायची आफत येईल. "व्यूहरचना सोडून नुसतेच डावपेच" सुधारणावादाकडे नेतात, तर "डावपेच नसलेली व्यूहरचना" साहसवादाकडे. आपण खंबीरपणे दोन्ही विकृतींशी मुकाबला केला पाहिजे. (३५)

१०.११ माकप आपल्या जन्मापासून भारतीय क्रांती योग्य शास्त्रीय दिशेने नेण्यासाठी या दोन्ही विकृतींशी खंबीरपणे लढत आला आहे. माकपच्या स्थापनेबरोबर जसा हा संघर्ष थांबलेला नाही, तसाच तो भारतीय क्रांती यशस्वी झाल्यावरदेखील थांबणार नाही. सोव्हिएत युनियन आणि पूर्व युरोपातील अनुभवावरून मार्क्सवाद-लेनीनवादाच्या क्रांतीकारी आशयाशी एकनिष्ठ रहाण्याची गरज किती आहे हे स्पष्ट होते. त्या आशयाला धोका पोचवणाऱ्या प्रवृत्तींविरुद्ध डोळ्यात तेल घालून जागे राहिले पाहिजे. सोव्हिएत युनियनमध्ये ही जागरूकता न पाळल्याने समाजवादाचे इतके नुकसान झाले की त्या क्रांतीची

२१व्या शतकात पुनरावृत्ती करणे अशक्यच आहे. (३६)

१०.१२ **कामगार-शेतकरी आघाडी:** भारतीय परिस्थितीमधील "आत्मनिष्ठ घटक" बळकट करायचे काम आपले व्यूहात्मक उद्दिष्ट गाठण्यासाठी कामगार-शेतकरी यांच्या बळकट एकजुटीवर अवलंबून आहे. सध्याच्या परिस्थितीत वर्गसंघर्ष बळकट करण्यासाठी ही आघाडी करण्याबाबत असलेली कमजोरी त्वरीत दूर केली पाहिजे. आपल्या देशातील वस्तुनिष्ठ परिस्थिती अशी आघाडी बनवण्यासाठी अनुकूल आहे. या बाबतीतल्या आत्मनिष्ठ कमजोऱ्यांवर आपण मात करायलाच हवी. अशी एकजूट घडवण्यासाठी शेतकरी विभागातील सर्वात शोषित आणि म्हणूनच क्रांतीकारी असलेल्या शेतमजूर आणि गरीब शेतकरी यांची एकजूट हा अत्यंत महत्वाचा घटक आहे.

१०.१३ कामगारवर्गीय एकजूट: कामगारवर्गाच्या नेतृत्वाखाली भारतीय जनतेला मुक्त करणे, हे आपले उद्दिष्ट आहे. कामगारवर्गाची एकजूट आणि त्याची जाणीव इतकी वृद्धिंगत व्हायला हवी की त्याने भारतातील भांडवलाच्या सत्तेविरुद्ध निर्णायक हल्ला करण्यासाठी इतर भारतीय शोषितांचे नेतृत्व करायला सिद्ध झाले पाहिजे.

१०.१४ पण साम्राज्यवादी जागतिकीकरणाच्या अवस्थेत हे कार्य खूप गुंतागुंतीचे बनते. नव-उदार धोरणामुळे श्रमिकांच्या संख्येत वेगाने वाढ होते खरी, पण हे श्रमिक ज्याला असंघटित क्षेत्र म्हणतात अशा विभागात ढकलले जातात. कायमस्वरूपी रोजगाराचे रूपांतर नैमित्तिक आणि कंत्राटी रोजगारात होते. यामुळे नफ्याचे प्रमाण प्रचंड वाढतेच पण तो कामगारवर्गात फूट राहील, तो एकत्र येणार नाही यासाठी सत्ताधारी वर्गांनी केलेला वर्गीय प्रयत्नदेखील असतो. कामगार मोठ्या आणि वाढत्या संख्येने नैमित्तिक, तात्पुरते आणि स्वयंरोजगारात ढकलले जात आहेत. या कमजोरीवर मात करण्यासाठी योग्य डावपेच स्वीकारले पाहिजेत आणि प्रचंड प्रमाणात असलेल्या असंघटित कामगारांना क्रांतीकारी चळवळीत आणून कामगारवर्गाची एकता मजबूत केली पाहिजे.

१०.१५ क्रांतीकारी चळवळींना नेहमीच कामगार संघटनांमधील अर्थवादाशी झगडावे लागले आहे. याबाबतीत २०व्या शतकातील समाजवादी चळवळींना काय अनुभव आला हे पाहून योग्य धडा घेतला पाहिजे, नव्या परिस्थितीत आगेकूच करण्यासाठी त्या अनुभवांपासून शिकले पाहिजे.

१०.१६ **अस्मितेचे राजकारण:** सत्ताधारी वर्ग नेहमीच, अगदी भांडवलशाहीची आगेकूच व्हायच्या आधीपासून, अस्मितेचा वापर करत आले आहेत. त्यांनी आपल्या वर्गीय सत्तेला आधार म्हणून वंशीय अस्मिता जशा जोपासल्या तसेच राष्ट्रवादाची नवनवी रूपेदेखील निर्माण केली. उदाहरणार्थ, १९व्या शतकाच्या अखेरीला निर्माण झालेला ज्यूवाद (Zionism). त्याचाच पुढे विकास होऊन आधुनिक काळात इस्रायल या राष्ट्राची निर्मिती झाली. (३७) सोव्हिएत युनियनचे विघटन झाल्यावर पूर्वाश्रमीच्या राज्यांच्या अस्मितांचा प्रतिगामी शक्तींनी आपली सत्ता बळकट करण्यासाठी उपयोग करून घेतला. या आधारावरच पूर्वाश्रमीच्या युगोस्लाव्हियाच्या ठिकऱ्या उडालेल्या दिसतात. भारतीय उपखंडाचे विभाजन करण्यासाठी ब्रिटीश साम्राज्यवादी आणि आपल्या देशातील सत्ताधारी वर्गांनी धार्मिक अस्मितांचा वापर केला होता. आजदेखील धर्म आणि जातींच्या नावाने केले जाणारे संघटन शोषितांमधील वर्गीय एकजुटीला छेद देते. वर्गीय एकजूट मोडण्यासाठी भांडवलदारवर्ग एका बाजूला अस्मितांच्या राजकारणाचा तर दुसऱ्या बाजूला अशा अस्मितांना प्रोत्साहन देणाऱ्या स्वयंसेवी संघटनांचा वापत करतो आणि सर्वसामान्य जनतेला बिगरराजकीय बनवतो.

१०.१७ मार्क्सवादाला विरोध करणारी आधुनिकोत्तर विचारसरणी राजकारण हे फक्त सूक्ष्म, स्थानिक पातळीवरच असते असे प्रतिपादन करते. तिच्या मते, राजकारण हे केवळ "वेगळेपण" आणि "अस्मिता" यावरच आधारीत असू शकते. अशा रीतीने ही विचारसरणी नव्या परिस्थितीत अस्मितेच्या राजकारणाला नवा आधार पुरवते.

१०.१८ या आधुनिकोत्तरवाद्यांच्या मतानुसार अस्मितेचे राजकारण आणि राजकीय संघटन हे वंश, धर्म, जात अथवा लिंग या आधारवरच होऊ शकते. वर्ग हा अस्मितेचा केवळ एक अलग घटक असतो. अशा रीतीने अस्मितेचे राजकारण कामगार वर्गाची संकल्पनाच नाकारते. अस्मितेच्या मूळ व्याख्येनुसारच अस्मितच्या राजकारणातून आणि राजकीय संघटनातून अलग अस्मितेला वगळले जाते. जेथे जेथे अस्मितेचे राजकारण मूळ पकडते तेथे तेथे विविध आणि अलग गटाममध्ये स्पर्धा आणि संघर्ष उपजू लागतात.

१०.१९ अस्मितेचे राजकारण अगदी आदर्शरित्या सत्ताधारी भांडवलदार वर्गाच्या हिताचे असते. बाजारपेठ अस्मिताभेदांचा पुरेपूर उपयोग करून घेते. वस्तुत: विकसित भांडवली समाजात विविध जीवनशैलींचे कौतुक केले जाते, वस्तू आणि फॅशन्स निर्माण केल्या जातात चंगळवादी समाजाचे चोचले पुरवण्यासाठी. कमी विकसित झालेल्या भांडवली देशांत अस्मितेचे राजकारण जागतिक त्ति भांडवलाला देशातील बाजारपेठेत हातपाय पसरून ती ताब्यात घ्यायला मदत करते. अस्मिता जोपासणाऱ्या गटांतील "वेगळेपण" (difference) बाजारपेठेच्या एकसंधपणावर वा तिच्या व्यवहारांवर काहीही परिणाम करत नाही. वर्गीय एकजुटीत छेद निर्माण करून लोकांच्या अभेद्य चळवळी निर्माण करायला अस्मितांचे राजकारण अडसर आणते. खास करून एनजीओ, स्वयंसेवी संघटना आणि तथाकथित नागरी समाजाच्या मार्फत अस्मितांचे राजकारण चालवले जाते. स्वत: एनजीओ आणि स्वयंसेवी संघटना परस्परांपासून फटकून असतात आणि त्यामुळे त्या स्वतंत्र अस्मिता जोपासणारी आदर्श वाहने बनतात.

१०.२० **जाती-आधारीत चळवळी:** सर्व शोषित आणि पीडितांची एकजूट करू पहाणाऱ्यांपुढे जातीय आधारावरील चळवळी आणि त्यांचे अस्मितेचे राजकारण हे एक मोठे आव्हान आहे. कामगारवर्गाच्या पक्षाला दलित आणि मागासवर्गीयांच्या जमिनी, वेतन आणि जीवनमानाचे संरक्षण यासाठी लढे उभारावे लागतीलच, पण त्याचबरोबर जातीय अत्याचार आणि जातिय विषमतेविरुद्धच्या संघर्षातही उतरावे लागेल. वर्गीय आणि सामाजिक प्रश्नांची सांगड घालूनच जातीय विघटन आणि अस्मितेच्या राजकारणाच्या दुष्परिणामांशी परिणामकारकरित्या झगडता येईल. वर्गीय शोषण आणि सामाजिक अत्याचार एकमेकांत कसे गुंफले आहेत हे मार्क्सवादी दृष्टिकोन दाखवून देतो आणि आपला याविषयीचा समज या दृष्टीवरच आधारलेला आहे. (३८)

१०.२१ समाजात वर्गीय शोषण आणि जातीय अत्याचार असे दोन्ही आहेत, या समजावरच माकपची भूमिका आधारलेली आहे. आपल्या देशाची आर्थिक-सामाजिक घडण पहाता जात, वंश आणि लिंगाधारीत सामाजिक अत्याचाराच्या रूपांसोबतच भांडवली आणि निम-सरंजामी शोषणही अस्तित्वात आहे. सत्ताधारी वर्ग वर्गीय शोषणातून अतिरिक्त मूल्य हस्तगत करतातच, पण आपले प्रभुत्व राखण्यासाठी ते विविध सामाजिक अत्याचाराचा वापर करतात. त्यामुळे शोषण आणि अत्याचार याविरुद्धचा संघर्ष एकाच वेळी केला पाहिजे.

१०.२२ **लिंगविषयक प्रश्न:** जातिव्यवस्थेच्या मार्फत सरंजामी प्रवृत्तीच्या प्रभावामुळे पितृसत्ताक विचारसरणीही फोफावली आहे. नव-उदार चौकटीने याला नवा आधार उपलब्ध करून दिला आहे. लिंगाधारित विषमता आणि अन्याय हे केवळ सरंजामशाहीचे अवशेष नसून वर्गीय समाजाच्या रचनेचा अंगभूत भाग आहेत. नव-उदार धोरणांमुळे कुटुंबातील विषम श्रमविभागणी आणि स्त्रियांवर आधीच अतोनात असलेले ओझे दोन्ही आणखीच वाढले आहे. शासनाने सामाजिक जबाबदारी स्वीकारायला नकार दिल्याने त्यात भरच पडली आहे. लिंगाधारीत विषमता आणि त्यावर आधारलेले सर्व प्रकारचे अन्याय यांविरुद्धचा लढा बळकट करायलाच हवा. कामगारवर्गाचा पक्ष या नात्याने वर्गसंघर्ष बळकट करायचा अंगभूत भाग म्हणून भारतीय जनतेची लिंगाधारीत अन्याय-अत्याचारविषयीची जाणीव प्रगल्भ करायलाच हवी.

१०.२३ **जमातवाद:** जमातवाद आणि धार्मिक मूलतत्त्ववादाच्या सर्व रूपांविरुद्धचा लढा पहायला हवा तो या संदर्भात. आपली वर्गीय चळवळ पुढे नेण्याच्या दृष्टीने लोकशाही अधिकार देणारी धर्मनिरपेक्ष

लोकशाही आवश्यक आहे. अशा लोकशाहीचा पाया खिळखिळा करायचे काम जमातवादी आणि धार्मिक मूलतत्त्ववादी शक्ती करत असतात (उदाहरणार्थ, रा. स्व. संघप्रणित "हिंदुराष्ट्रा"ची असहिष्णु, पाशवी, फॅसिस्ट संकल्पना).. या शक्ती लोकांच्या मनातील धर्मभावनांचे शोषण करत, जमातवादी भावना उद्दीपित करून कामगारवर्ग आणि समाजातील शोषित जनतेत फूट पाडतात. त्यामुळे जमातवादाचा निर्णायक पराभव करण्यासाठी आपल्या देशातील क्रांतीची प्रगती होणे सर्वथा अशक्य आहे.

१०.२४ **राष्ट्रवाद:** भांडवलदार वर्गाचा उदय आणि त्याने सरंजामशाहीविरुद्ध केलेला राष्ट्रीय जाणिवेचा वापर यातून आधुनिक राष्ट्रवादाची निर्मिती झाली आहे. विसाव्या शतकात वासाहतिक आणि निम-वासाहतिक देशांमध्ये वासाहतिक आणि साम्राज्यवादी सत्तेविरुद्ध लढण्यासाठी राष्ट्रवादाची निर्मिती झाली. या पूर्व-वासाहतिक पण नव्याने स्वतंत्र झालेल्या देशांच्या सत्तेची सूत्रे सत्ताधारी वर्गांनी ताब्यात घेतल्याने राष्ट्रवादाचा आशय पातळ झाला. साम्राज्यवादी जागतिकीकरणात राष्ट्रीय सार्वभौमत्वावर लक्ष्य केंद्रित करून हल्ले चढवले जात आहेत. सर्व राष्ट्र-राज्यांनी आपले नैसर्गिक सार्वभौमत्व आपल्या चरणी वहावे अशी साम्राज्यवादी वित्त भांडवलाची मागणी असते.

१०.२५ विविध प्रादेशिक आणि वांशिक अस्मितांवर आधारलेली नवी आव्हानेदेखील उभी केली जात आहेत. तेलंगण, दार्जिलिंग आणि देशाच्या इतर अनेक भागांत होत असलेली स्वतंत्र राज्याच्या मागणीची आंदोलने केवळ देशाच्या भाषिक रचनेचा पायाच ठिसूळ करतात, असे नव्हे तर शोषित वर्गांच्या एकजुटीलाच चूड लावतात. (३९)

१०.२६ राष्ट्र-राज्यांची एकात्मता आणि त्यांचे सार्वभौमत्व संपुष्टात आणण्यासाठी आंतरराष्ट्रीय वित्त भांडवल वांशिक राष्ट्रवाद, आणि फुटीरतावादाला प्रोत्साहन देते. आपल्या संकुचित हेतूंसाठी लोकांत फूट पाडणाऱ्या अशा वंशवादी राष्ट्रवादाला विरोध करत असतानाच त्यांच्यावरील अन्याय अत्याचाराविरुद्ध आपण संघर्ष करत राहिले पाहिजे. त्याचवेळी साम्राज्यवादी जागतिकीकरणाविरुद्ध वर्गीय एकजूट बळकट करण्यासाठी राष्ट्रीय सार्वभौमत्व आणि साम्राज्यशाहीविरोधी राष्ट्रवादाचे संरक्षण केलेच पाहिजे.

१०.२७ जगात कुठेच नसेल इतके सामाजिक-सांस्कृतिक वैविध्य असलेल्या भारतासारख्या बहुराष्ट्रीय देशात अशा प्रवृत्ती वारंवार उफाळून येत राहातात. त्या शोषित वर्गांच्या एकजुटीत बाधा आणून आपले व्यूहात्मक उद्दिष्ट गाठण्यात प्रतिरोध निर्माण करतात. वर्गीय प्रश्नांवर शोषित वर्गांची जोमदार आणि व्यापक चळवळ उभी करूनच या प्रवृत्तींचा प्रतिकार करणे शक्य आहे. भाषिक तत्त्वावर देशाची झालेली बांधणी मोडून राज्यांची पुनर्रचना करायच्या मागणीला आपला विरोध आहे तो यासाठीच.

# ११
# समारोप

**११.१** जागतिक समाजवादाची पीछेहाट झालेली असली आणि आंतरराष्ट्रीय वर्गशक्तींचे संतुलन साम्राज्यशाहीच्या बाजूने गुणात्मकरित्या झुकलेले असले तरी माकप, मार्क्सवाद-लेनीनवादाच्या सर्जनशील शास्त्रीय तत्त्वज्ञानाच्या आधारे, भारतीय जनतेला खरी आणि संपूर्ण मुक्ती मिळावी या उद्दिष्टाला कटिबद्ध आहे. आपले हे उद्दिष्ट गाठण्यात २०व्या शतकात कितीही पीछेहाट झालेली असली आणि कमजोऱ्या राहिलेल्या असल्या तरी मानवी विकासाची मूलभूत दिशा, त्याचे ऐतिहासिक क्षितीज हे अनिवार्यपणे राष्ट्रीय आणि सामाजिक मुक्ती हेच आहे.

११.२ आजच्या परिस्थितीत माकप मार्क्सवाद-लेनीनवादाच्या आशयापासून दूर नेणाऱ्या सर्व प्रकारच्या अपप्रवृत्तींना बळी न पडता, श्रमिक जनतेची एकजूट उधळू पहाणाऱ्या शक्तींशी दोन हात करण्यासाठी "आत्मनिष्ठ घटक" मजबूत करायला कटिबद्ध आहे. अशी आव्हाने झेलण्यासाठी आपण आपल्या पक्ष परिषदांतून वारंवार डावपेच ठरवत आलो आहोत. भविष्यातदेखील आपल्याला या आधारावर योग्य ते डावपेच निवडावे लागतील.

११.३ माकप आपल्या आजपर्यंतच्या वाटचालीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करतो. मार्क्सवाद-लेनीनवादाचा क्रांतीकारी आशय शिरोधार्य मानून सर्व अपपवृत्तींशी लढताना आलेला अनुभव ध्यानात घेतो. विसाव्या शतकातील मानवी संस्कृतीवर अमीट ठसा उमटवणाऱ्या समाजवादाचा अनुभव आणि आजच्या जगातील भांडवलशाही आणि समाजवादातील आर्थिक-सामाजिक व्यवस्थांच्या उत्क्रांतीचे परिशीलन करतो. अशा रीतीने माकप भारतीय जनतेला अंतीम विजय मिळेपर्यंत ही प्रक्रिया अप्रतिहत चालू ठेवण्याशी कटिबद्ध आहे. आपला पक्ष देशातील वर्गशक्तींचे संतुलन बदलण्यासाठी सर्व शोषित जनतेला संघटित करण्याचे क्रांतीकारी कार्य अथकपणे करत राहील आणि जनतेची लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी क्रांतीकारी चढाई करून त्याच्या आधारावर मानवी मुक्तीचा एकमेव पाया असतो अशा समाजवादाची प्रतिष्ठापना करील.

## स्पष्टीकरणात्मक टीपा

(१) पॅरा १.७